दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.१४ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक१५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

### बीड जिल्ह्यात मनाई आदेश लागू

बीड : मराठा,ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन रोजी, विविध प्रकारचे होणारेउपोषणे,आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने सुरु आहेत. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होउुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

# पून्हा चारशे गाड्यांचा ताफा घेऊन 'दादा' मुंबईत!

## अनिल जगताप:मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले हा ऐतिहासिक पक्षप्रवेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप आणि सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील उबाठा सेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ऍड.संगीता चव्हाण तसेच बीड जिल्ह्याचे युवासेना जिल्हाप्रमुख गजानन कदम, युवासेनेचे जिल्हाप्रमुख ऍड. रविराज बडे आणि त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांचा शिवसेनेतील प्रवेश हा ऐतिहासिक प्रवेश सोहळा आहे. बीड जिल्ह्यातून तब्बल दोन हजार महिला भगिनी आणि युवक बारा तासांचा प्रवास करून मुंबईला शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी आले आहेत ही बाब पक्षाला ऊर्जा देणारी आहे अशी भावना महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष, लोकप्रिय मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी पक्ष प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली.

काल दि. १२ ऑगस्ट रोजी हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा सेनेतील महिला आघाडी जिल्हाप्रमुख तथा राज्य महिला आयोगाच्या सदस्य ऍड. संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख ऍड. रवीराज बडे, गजानन कदम आणि त्यांच्या सर्व समर्थक कार्यकर्त्यांनीवर्षा निवास्थान मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याकरिता बीड जिल्ह्यामधून चारशे गाड्यांचा ताफा मुंबई येथे डेरे पान २ वर...

### अनिलदादांच्या दावेदारीला बळकटी

बीड मतदार संघात विधानसभेसाठी यंदा अनिलदादा जगताप यांना मतदारांकडून प्रबळ उमेदवार मानन्यात येत आहे व त्या पद्धतीने अनिलदादा यांचे बीड मतदार संघावर प्रबल्य असल्याचे देखील जाणवत आहे. अनिलदादा जगताप सध्या विधानसभेसाठी कार्यकर्ते आणि मतदारांची बांधणी करत जोरदार तयारीला लागले आहेत. दिवसेंदिवस अनिलदादा यांच्या गोठात बीड मतदार संघातील निष्ठावंत आणि तळमळीच्या कार्यकर्त्यांचा प्रवेश होत आहे. विधानसभेच्या तोंडावर शिवसेनेत कार्यकर्त्यांची वाढत असलेली इनकमिंग अनिलदादा जगताप यांच्या विधानसभा दावेदारीला बळकटी देऊन जात आहे.





### यांनी केला शिवसेनेत प्रवेश

उबाठा सेनेतील ऍड.संगीता चव्हाण, रविराज बडे, गजानन कदम यांच्यासह अमोल जाधव, सचिन जाधव, कृष्णा सायलो, संकोड (सरपंच), संतोष भाऊ ललवाणी माजलगाव, रमेश सावंत माजलगाव, दिपकचंद्र शेनोरे, दिपक कदम, शैलेश कासार, जगदीश वखरे, अक्षय घल्लाळ, ओम आगलावे, प्रवीण लांडगे, यश लांडगे, सचिन उडान, अमन भालेकर, नाना शिंदे, गणेश उडान, मेघनाथ काळे, आदित्य जाधव, स्वयम् पवार, अभी तीठे, जयदत्त किरकत, राजेंद्र सानवटे, रामेश्वर किरकट,परशुराम कुटे, विशाल डोंगर, बिभीषण केसकर, अशोक सोनवणे ,राजेभाऊ कराड, संदिप नखाते, शेख फरजाना – उपजिल्हा संघटक, बीउ, इंद्रजीत पांचाळ, गौरव राठोड, बाळसाहेब चव्हाण जमुना साखरे – विधानसभा समन्वयक परळी, काझी रुझद – शहर संघटीका, मनोरमा डोईफोडे –उपजिल्हासंघटक, कविता घोरपडे – विधानसभा समन्वयक, बीड, कावेरी घुले – तालुका संघटक, सुनिता जाधव – शहर संघटक, प्रमील भोसले – लालुका संघटक परळी, योगीता चिंचकर–सहरसंघटक मजलगाव, धोंडीराम बाळू जाधव, बाबासाहेब राठोड, सुभाष जाधव, उत्तम जाधव, अनुसया पवार, यमुनाबाई राठोड, सोजरबाई चव्हाण,राज पाटील –उपतालुकाप्रमुख शिरूर यांनी व त्यांच्या हजारो समर्थक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

## वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा निवारा देऊ

### डॉ.योगेश क्षीरसागर: वृत्तपत्र विक्रेते, कामगारांना विमा संरक्षण



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ऊन, वादळ, वारा, पावसाची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेते नियमितपणे वृत्तपत्र वाटपाचे काम करतात. संघटनेच्या मागणीनुसार विमा संरक्षण दिले. बीड बसस्थानकात वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.बीडमध्ये सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात मंगळवारी (दि.१३) दोनेशहून अधिक वृत्तपत्र विक्रेत्यांसह कामगारांना विमा काढून प्रातनिधिक स्वरूपात प्रमाणपत्राचे वाटप केले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वितरक प्रताप सासवडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नगरसेवक गणेश वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार विनोद पिंगळे, न्यू इंडिया एन्श्युरंस कंपनीचे व्यवस्थापक कैलास काळे, संपादक दिलीप खिस्ती, सुनील क्षीरसागर, राजेंद्र होळकर, प्रतिभा गणोरकर, सुभाष चौरे, व्यंकटेश वैष्णव, सोमनाथ खताळ, गणेश पठाडे, गणेश मुळे, गिरीश मोहेकर, रवी उबाळे, पान २ वर...

### संपादक, वृत्तपत्र विक्रेत्यास श्रद्धांजली

नुकतेच निधन झालेले ज्येष्ठ संपादक कै.नामदेवराव क्षीरसागर, कै.रमेशआप्पा बेद्रकर, कै.बाबासाहेब मस्के, कै.सुधाकर सोनवणे, वृत्तपत्र विक्रेते कै.रमेश देवळे यांना उपस्थितांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### संवाद यात्रेचे स्वागत

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे. या संवाद यात्रेचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे हे करत आहे. त्यांची संवाद यात्रा बीडमध्ये सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात दाखल होताच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वागत केले.

## अभिवादन करण्यासाठी उपस्थित राहावे

### शिवसंग्रामचे आवाहन :आज विनायकराव मेटेंची द्वितीय पुण्यतिथी

बीड/,पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणा निमित्त दि. १४ ऑगस्ट बुधवार रोजी विनायकराव मेटे यांच्या स्मृतीस्थळावर सकाळी ९:०० वाजता अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ ज्ञानोबा तुकोबा पुरस्कार प्राप्त ह.भ.प. संजय पाचपोर महाराज यांचे कीर्तन आशीर्वाद लॉन्स बीड येथे सकाळी ११:०० वा. संपन्न होणार आहे. या अभिवादनास आणि कीर्तन



कार्यक्रमास लोकनेते विनायकराव मेटे यांच्यावर प्रेम करणारे सर्व क्षेत्रातील मान्यवर, नागरिक आणि चाहत्यांनी उपस्थित राहावे. असे आवाहन शिवसंग्रामच्या वतीने करण्यात आले आहे.

राजेगाव सारख्या एका खेड्यात जन्म घेऊन ते सलग पाच वेळा विधानपरिषद सदस्य अशी कारकीर्द असणाऱ्या लोकनेत्याचे असे अकाली जाण्याने विस्थापितांची मोठी हानी झाली आहे. आपल्या सामाजिक आयुष्यामध्ये विस्थापिता करिता काम करण्याची धडपड आणि त्यांना राजकारण आणि समाजकारण यात संधी देत प्रस्थापितांच्या बरोबरीने पुढे आणणारे पान २ वर...

## निवडणुपूर्वी 'नगर'चे 'अहिल्यानगर' होणार?

### दिलासा : प्रस्तावाची ४० मिनिटातच घोषण

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर 'अहिल्यानगर' करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांसमोर ठेवण्यात आल्यावर ४० मिनिटांतच घोषणा करण्यात आली. प्रा. राम शिंदे यांनी यासंदर्भात माहिती दिली असून, आगामी विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी जिल्ह्याचे नाव बदलले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.जामखेड तालुक्यातील चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रा. शिंदे यांनी सांगितले की, नामांतराचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आलेला आहे. आचारसंहितेपूर्वीच या प्रस्तावाला मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

याचिकाकर्ते शेख मसूद इस्माईल शेख व अन्य विरुद्ध केंद्र सरकार व अन्य अशा या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, नामांतराच्या प्रश्नावर वेगवेगळी मते असू शकतात. एखाद्या विभागात राहात असलेल्या लोकांचे त्याच्या नावाबद्दल बाजूने किंवा विरोधात मत असू शकते. न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार वापरून पान २ वर...

## शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्या

### मयुरीताई खेडकर: नाहक अटीमुळे शेतकरी वंचित

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य सरकारने गतवर्षीच्या कापुस तसेच सोयाबीन या पिकांसाठी हेक्टरी ५ हजार भावांतर अनुदान जाहिर केले आहे. मात्र या अनुदान वाटपामध्ये ई–पिक पाहणीची अट असल्याने गेवराई तालुक्यातील तब्बल ७० टक्के शेतकरी या आनुदानापासुन वंचित राहणार आहेत. बहुतांश शेतकरी वर्गाला ई–पिक पाहणी हे माहिती सुध्दा नाही. तसेच ई–पिक पाहणी करताना शेतकऱ्यांना तांत्रिक आडचणी देखील येत असल्याने ई–पिक पाहणी आपलोड झालेली नाही. त्यामुळे ई–पिक पाहणीची अट रद्द करुन शेतकऱ्यांना सरसकट आनुदान द्यावे, अशी मागणी मयुरी खेडकर यांनी केली आहे.



गेवराई तालुक्यात मागील वर्षी कापसाबरोबरच सोयाबीन चा पेरा अधिक झाला होता. मात्र पाहिजे तसा कापूस व सोयाबीनला भाव मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची घोषणा केली आहे. या संदर्भातील दिनांक २८ जुलै २०२४ रोजी शासन निर्णयानुसार सन २०२३ मधील खरीप हंगामातील सोयाबीन उत्पादन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार अनुदान देण्यात येईल असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यामधून समाधान व्यक्त जात असले तरी या अनुदानासाठी ई–पिक पाहणी ही जाचक अट पान २ वर...

### धनंजय मुंडे ४०० कोटी २४ लाखांचा पीकविमा मंजूर

## विमा कंपनीला फैलावर घेत, निर्देश

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सन २०२३–२४च्या खरीप व रब्बी हंगामात मिळून एकूण ४०० कोटी २४ लाख रुपये पीकविमा आतापर्यंत मंजूर करण्यात आला असून त्यापैकी आजपर्यंत ३७८ कोटी २१ लाख रुपयांचे वितरण संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात करण्यात आले आहे. तर उर्वरित २२ कोटी ३ लाख रुपयांचे वितरण विमा कंपनीने कोणतेही कारण न देता ३१ ऑगस्ट च्या आत पूर्ण करावे, असे निर्देश आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पीक विमा कंपनीस दिले आहेत.



विमा कंपनीने अंबाजोगाई, परळी सह काही तालुक्यातील महसूल मंडळांमध्ये कोणतेही कारण न देता काही शेतकऱ्यांचे विमा अर्ज नाकारल्याचे निदर्शनास आले असून, कोणतेही तांत्रिक कारण किंवा सबब न देता ते सर्व विमा अर्ज कंपनीने मंजूर करून त्या शेतकऱ्यांना देखील त्यांचा प्रलंबित पीकविमा ३१ ऑगस्ट पूर्वी वितरित करावा, असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी आज संपन्न झालेल्या बैठकीत दिले आहेत. तसेच या दोन्हीही प्रक्रियांचा कृषी संचालक यांनी दैनंदिन स्वरूपात आढावा घ्यावा व मंत्री कार्यालयास अवगत करावे, असेही निर्देश मुंडेंनी आजच्या बैठकीत दिले आहेत.

बीड जिल्ह्यातील प्रलंबित पिकविम्याच्या संदर्भात आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अधिकारी व भारतीय कृषी विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक संपन्न झाली. या बैठकीस कृषी संचालक विनयकुमार आवटे, उपसचिव पान २ वर...



# संपादकीय

## संशयकल्लोळात 'सेबी'!

सेबी'प्रमुखांचे वर्तन पारदर्शी आहे असे केवळ म्हणणे पुरेसे नसून, ते खरोखरच पारदर्शी असल्याचे दिसावे लागते. 'हिंडेनबर्ग'चे आरोप हे दिसणे धूसर करतात.हिंडेनबर्ग' या अमेरिकी गुंतवणूकदार कंपनीने आपल्या नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी–बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक. भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' म्हणजे 'सेबी' आणि तिच्या प्रमुखांविषयीचे 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप संबंधित यंत्रणांस परेशान तर करतीलच; पण गुंतवणूकदारांच्या मनांत गोंधळ वाढवतील. ते ज्या कंपनीशी संबंधित आहेत त्या कंपनीच्या समभागांचे सोमवारी जे काही झाले त्यावरून हा गोंधळ किती गंभीर असू शकतो हे कळेल. याआधी साधारण दीड वर्षापूर्वी या हिंडेनबर्गाने सध्या पंचमहाभूतांस कवेत घेणाऱ्या अदानी समूहावर आरोप केले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन चौकशी समित्याही नेमाव्या लागल्या. चौकशी करणाऱ्या 'सेबी'ने हिंडेनबर्गास नोटीस पाठवली आणि तीस उत्तर देताना या गुंतवणूक–गृहाने 'सेबी'च्या चौकशीलाच वाकुल्या दाखवल्या. येथपर्यंत ठीक. पण या वेळी हिंडेनबर्ग आणखी एक पाऊल पुढे गेले असून अदानी–संबंधित परदेशी वित्तसंस्थांत 'सेबी'प्रमुख आणि त्यांच्या पतीचे गुंतवणूक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यापर्यंत या कंपनीची मजल गेली. तसेच या हितसंबंधांमुळे अदानीसंदर्भातील चौकशी प्रामाणिकपणे होत नसल्याचे हा नवा आरोप सूचित करतो. हे आणखी धोकादायक. त्यामुळे बुच दम्पतीने तातडीने या संदर्भात खुलासा केला आणि आरोप बिनबुडाचे असल्याचा दावा केला. या इतक्या गंभीर आरोपांमुळे राजकीय राळ उडली नसती तरच नवल. विरोधकांनी यावर संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली. यावर नागरिकही आपापले राजकीय राग–लोभ सांभाळत जमेल तशा भूमिका घेताना दिसतात. तथापि त्या सगळ्याच्या पलीकडे जात त्यावर भाष्य व्हायला हवे.ते करताना आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे माधबी बुच यांची पार्श्वभूमी. खासगी क्षेत्रातून 'सेबी' या भांडवली बाजाराच्या सरकारी नियंत्रकपदी नेमणूक झालेली ही पहिली व्यक्ती. 'सेबी'चे आतापर्यंतचे सर्व प्रमुख हे सरकारी सेवेतून निवडले गेलेले होते. माधबीबाईंचा मात्र अपवाद. त्या जवळपास दोन दशके 'आयसीआयसीआय' या खासगी बँकेत होत्या आणि नंतर मध्येच नोकरी सोडून पतीसमवेत त्यांनी सिंगापूर येथे एक गुंतवणूक कंपनी (फंड) स्थापन केली. या काळात त्या सिंगापूरवासी होत्या. 'सेबी'च्या प्रमुखपदी निवड झाल्यानंतर जवळपास दोन आठवड्यांनी या गुंतवणूक कंपनीतील आपला सर्व वाटा त्यांनी पतीस विकला आणि त्याची सर्व माहिती सिंगापूर सरकारसह भारतीय यंत्रणांनाही त्यांच्याकडून दिली गेली. 'हिंडेनबर्ग' आरोप करतो तो नेमक्या याच गुंतवणूक कंपनीवर. या कंपनीने म्हणजे पर्यायाने बुच दाम्पत्याने अदानींशी संबंधित अनेक वा काही परदेशी कंपन्यांत गुंतवणूक केली आणि ती दडवून ठेवली असे हिंडेनबर्गचे म्हणणे. अदानी समूहात या दोघांचे हितसंबंध असल्याने त्या कंपनीच्या व्यवहारांची चौकशी 'सेबी' प्रामाणिकपणे करू शकली नाही, असे हिंडेनबर्गचा नवा अहवाल सुचवतो. गंमत म्हणजे हा आरोप हिंडेनबर्गने कोणा स्वतंत्र संशोधनाच्या आधारे केलेला आहे असे नाही. तर जी माहिती संबंधित यंत्रणांना आधीच दिली गेलेली आहे, ती त्यांच्या वेबसाइट्सवरून वा अन्य मार्गाने गोळा करून हिंडेनबर्ग त्यातील टिंबे जोडतो आणि बुच दाम्पत्यास घायाळ करतो.या दोघांचे हे घायाळ होणे अपरिहार्य आहे. याचे कारण 'काळ्या' आणि 'पांढऱ्या'च्या बेचक्यात अडकलेले काही प्रश्न. उदाहरणार्थ 'सेबी'सारख्या यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्यांना आवश्यक ते 'डिसक्लोजर'– अर्थात प्रकटन– रास्त वेळी द्यावे लागते. म्हणजे आपण, आपल्या कुटुंबीयांनी, मुला–बाळांनी कोठे गुंतवणूक केलेली आहे, कोठे त्यांचे आर्थिक संबंध आहेत इत्यादींची माहिती जाहीर करणे. त्यामुळे संशयास वाव राहात नाही. तशी ती सर्व माहिती माधबीबाईंनी जाहीर केली होती का? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तर रविवारी उशिरा रात्री त्यांना ''पण आमची काहींतील गुंतवणूक मी 'सेबी'प्रमुख होण्याच्या आधीची आहे'', अशा छापाचा खुलासा का करावा लागला? तसेच 'सेबी'च्या प्रमुख या नात्याने अदानी प्रकरणाच्या चौकशीचा निर्णय घेताना ज्या ज्या परदेशस्थ कंपन्यांचा उल्लेख झाला त्या वेळी त्या कंपन्या आणि बुच कुटुंबीय यांतील संबंध त्यांनी उघड केले का? किंवा या कंपन्यांबाबत निर्णय घेताना त्यांनी त्या निर्णयप्रक्रियेपासून स्वत:स दूर (रिक्यूज) ठेवले का? न्यायाधीश स्वत:शी दूरान्वयानेही संबंधित प्रकरण सुनावणीस आल्यास त्या खटल्यापासून स्वत:स दूर करण्याची विनंती वरिष्ठांस करतात. तसे काही माधबीबाईंनी केले होते किंवा काय? हे गुंतवणूकदारांस समजणे आवश्यक आहे. व्यवस्थेच्या पारदर्शकतेविषयी संशय दूर होणे गरजेचे आहे कारण अशा पारदर्शक बाजारपेठा गुंतवणुकीसाठी सर्वार्थाने आकर्षक ठरतात. पारदर्शकतेत सुरक्षेची हमी असते. भारतीय भांडवली बाजार असा सुरक्षित आणि आकर्षक राहील याची जबाबदारी 'सेबी'ची. म्हणून 'सेबी'प्रमुख माधबीबाईंचे वर्तन महत्त्वाचे. ते पारदर्शी आहे असे केवळ म्हणणे पुरेसे नाही. तर ते खरोखरच पारदर्शी आहे असे दिसावे लागते. 'हिंडेनबर्ग'चे आरोप हे दिसणे धूसर करते. म्हणून त्याची दखल घ्यावी लागते.आणि ती सत्ताधारीही घेतात. पण ती घेताना यामागे 'परदेशी शक्ती' असल्याचा आरोप ते करतात. यावर हसावे की रडावे, हा प्रश्न. ''आपल्या वाईटासाठी जगात अनेक देश दबा धरून आहेत'', ही विचारधाराच मुळात स्वत:कडे अकारण मोठेपणा घेणारी. भारतीय यंत्रणांनी माती खाल्ली असेल आणि हा मुद्दा येथील विरोधकांनी उचलला असेल तर त्यात परदेशी हाताचा संबंध येतो कोठे? सत्ताधाऱ्यांवर केलेल्या प्रत्येक आरोपामागे परकीय शक्तींचा हात असतो हे कथानक इंदिरा गांधी यांच्या काळात लोकप्रिय होते. त्या गेल्या त्यास चार दशके लोटली. हा परदेशी हात काही कोणी शोधून काढलेला नाही. आणि दुसरे असे की विरोधकांनी सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणणाऱ्या मुद्द्यांमागे परकीय शक्तींचा हात असतो/ आहे हे खरे मानायचे तर मनमोहन सिंग पंतप्रधान असताना झालेल्या डझनभर आरोपांचे काय? त्या वेळी तर दूरसंचार ते कोळसा अशा अनेक क्षेत्रांत गैरव्यवहारांचे आरोप झाले आणि नंतर ते सर्वच्या सर्व बिनबुडाचे असल्याचे न्यायालयांत सिद्ध झाले. त्या आरोपांचे राजकारण करत सत्तेवर आलेल्यांनाही ते आरोप सिद्ध करता आले नाहीत. तेव्हा त्या आरोपांमागे 'परकीय शक्तीं'चा हात होता असे मानायचे काय? तेव्हाचे आरोप तेव्हाच्या विरोधकांनी सदसद्विवेकबुद्धीस स्मरून केलेले आणि आताच्या विरोधकांचे आरोप मात्र परकीय शक्तींनी प्रेरित, हे कसे?तेव्हा बुच–दाम्पत्याने कायदेभंग केला किंवा काय, याबाबत संदिग्धता जरूर असेल. त्यांनी सर्व कायदेकानू पाळले असतीलही. पण अशा पदांवरील व्यक्तींचे वर्तन केवळ कायदेशीर असणे पुरेसे नसते. ते औचित्यास धरूनही असावे लागते. त्यासाठी 'सेबी'प्रमुखांच्या व्यवहारांची अन्य यंत्रणेमार्फत चौकशी होण्यात हरकत काय? कर नसेल तर त्यास डर असायचेही कारण नाही. तेव्हा विरोधकांस अदानी मुद्द्यावर निष्प्रभ करावयाचे असेल तर त्यांनी यावर दबाव वाढवायच्या आत सरकारने चौकशी जाहीर करणे राजकीयदृष्ट्यादेखील शहाणपणाचे ठरेल. असा राजकीय शहाणपणा सरकारने दाखवावा. 'सेबी'सारख्या महत्त्वाच्या यंत्रणाप्रमुखास संशयकल्लोळात जखडून ठेवणे योग्य नाही.

# विद्यार्थ्यांनी बनविले अत्याधुनिक तंत्रज्ञान

## कुतूहल : रोबोटिक्स, एआय प्रोटोटाइपची झलक



पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

कचरा विलगीकरण करणारे रोबोट, भूकंपग्रस्त भागात शोध घेणारा रोबोट, आग विझवण्यास सज्ज असलेला अग्निशमन रोबोट, कल्पकतेने कोडे सोडवणारा रोबोट अशा भविष्यातील तंत्रज्ञानाची झलक रोबोटेक्स इंडिया चॅम्पियनशिपमध्ये पाहायला मिळाली. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यातील तांत्रिकदृष्ट्या कुशल शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या रोबोटिक्स, एआय प्रोटोटाइपची झलक दाखवली.रोबोटिक्स इंडिया चॅम्पियनशिप या दरवर्षी होणाऱ्या स्पर्धेचे यंदा पुण्याजवळील लोणी येथील एमआयटी शैक्षणिक संकुल मध्ये आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांपासून ते विविध राज्यांमधील राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांपर्यंत सुमारे दोन हजार विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. लाईन फॉलोवर, ऑर्डीनोड, पझल सॉल्व्हर, रोबो सुमो, फायर फायटर, उद्योजकता अशा विविध प्रकारांमध्ये या महोत्सवामध्ये स्पर्धा रंगल्या. यामध्ये विशेषतः प्राथमिक आणि माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या कौशल्याची चुणूक पाहायला मिळाली.

रोबोटिक्स इंडियाच्या संचालिका पायल राजपाल म्हणाल्या, या स्पर्धेमध्ये साठ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी हे सरकारी शाळांमधील आहेत. या विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा बरोबरच तांत्रिक आणि वैज्ञानिक माहिती मिळावी आणि त्यांच्यातील तंत्रज्ञान अधिक वाढीस लागावे यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या नऊ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली होती. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी हे डिसेंबरमध्ये युरोपमधील एस्टोनिया या देशांमध्ये होणाऱ्या रोबोटिक्स वर्ल्ड या ऑलम्पिक दर्जाच्या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत.यावेळी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कुलपती, कार्यकारी संचालक सुनीता व्यंकट, स्टर्लिंग टेक्नॉलॉजीज लिमिटेड ग्रुपच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी अंजली बायस, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे नालिटिक्स आणि बिझनेस इंटेलिजन्सचे महाव्यवस्थापक पुष्पेंद्र कुमार, आयटी गव्हर्नन्स रिस्क, नड इंडियाचे संचालक अली खान, फिक्की फ्लो पुणे चॅप्टर चेअर पिंकी राजपाल, आयसीटी आणि प्रशिक्षण विभाग उखएढ आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदचे डॉ प्रवीण बी बिंझा, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक रोबोटिक्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी पुणे येथील उत्कृष्टतेचे केंद्र प्रमुख डॉ. शांतीपाल ओहोळ, कॉर्पोरेट रिस्पॉन्सिबिलिटीच्या प्रीती बी, ग्लोबंट कंपनीच्या लीडर एचआर आणि सीएसआर प्रमुख मृण्मयी कोष्टी उपस्थित होत्या.या स्पर्धेचे प्रायोजक असणाऱ्या स्टारलाईट टेक्नॉलॉजीच्या ग्रुप ह्यूमन रिसोर्स अधिकारी अंजली बायस म्हणाल्या, या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक गुण तपासणे आणि त्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळवून देणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. छत्रपती संभाजीनगर आणि सिल्वासा येथे असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये आम्ही यापूर्वी अशा प्रकारे प्रयोग केले आहेत. त्यामुळेच तेथील काही विद्यार्थी हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील रोबोटिक स्पर्धांमध्ये भारताचे नाव उज्वल करत आहे.फिक्की फ्लो संस्थेच्या पुणेच्या प्रमुख पिंकी राजपाल म्हणाल्या की या स्पर्धेमध्ये देशाच्या विविध भागातील २००० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहे. याचा आम्हाला निश्चितच आनंद आहे. हेच विद्यार्थी उद्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भारताचे नाव मोठे करणार आहेत. जेनेसिस असोसिएट्स इंडिया चे अली खान म्हणाले, चार वर्षांपासून आम्ही या स्पर्धेची निगडित आहोत, चार वर्षांमध्ये बाराशे विद्यार्थ्यांना कंपनीच्या माध्यमातून आम्ही सहकार्य केले आहे. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना वैज्ञानिक क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध करून देणे यासाठी आम्ही मुख्यतः कार्य करीत आहोत. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर व्यासपीठ मिळत आहे ही निश्चितच गौरव असतात बाब आहे.



# धरण परिसरातील उद्यानाचे काम कधी!

## प्रा.ईश्वर मुंडे : अन्यथा जन आंदोलन करू

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरापासून अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या जायकवाडी प्रकल्प अंतर्गत बांधण्यात आलेल्या माजलगाव धरण परिसरात उद्यान व वाटर पार्कची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे .पण उदासीन मानसिकतेत असलेल्या प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी माजलगावकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे सपसेल डोळे झाक केलेली आहे .

माजलगाव धरण परिसरात उद्यान व वाटरपार्क साठी पुरेशी जागा उपलब्ध आहे मात्र आज तागायत हा प्रश्न प्रलंबितच का राहिला ? असा प्रश्न उपस्थित करून या प्रश्नाकडे सपसेल डोळे झाक करणाऱ्या प्रस्थापित सत्ताधारी व विरोधकांनीही यावर आज पर्यंत का आवाज उठवला नाही? असा प्रश्न उपस्थित करून माजलगावकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न असलेल्या उद्यान व वाटर पार्क हे मंजूर करून लवकरात लवकर त्याचे काम सुरू करण्यात आले पाहिजे. उद्यान व वॉटर पार्क सारखा प्रकल्प माजलगाव परिसरात राबविण्यात आला असता तर माजलगावच्या वैभवात आणखीन भर पडली असती व वाटर पार्क सारख्या प्रकल्पामुळे जे लोक आज धरण परिसरात स्विमिंग साठी जात आहेत त्यांचे धरण परिसरात टाकलेल्या जाळ्यात अडकून काही लोकांचे दुर्दैवी मृत्यू देखील झालेले आहेत याचेच उदाहरण म्हणजे डॉ. फपाळ , पि.एस.आय. सोनवणे सारख्या कर्तबगार लोकांना जीव गमवावा लागलेला आहे. अशा दुर्घटना पुन्हा होऊ नये यासाठी या परिसरात वाटर पार्क व उद्यान होणे आवश्यक आहे. धरण परिसरात होत असलेले अतिक्रमण शासनाने लवकरात लवकर काढून या जागेवर उद्यान व वाटर पार्क सारखा प्रकल्प राबवावा आणि माजलगावच्या वैभवात भर टाकावी. माजलगावकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या मागण्या वेळीच मान्य न झाल्यास आम्ही जन आंदोलन उभा करणार असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी मत व्यक्त केले. प्रा.ईश्वर मुंडे यांनी दि.१३ ऑगस्ट रोजी माजलगाव धरण परिसराची पाहणी केली यावेळी लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर नाना शिंदे, काँग्रेस नेते दत्ता कांबळे, अभय भैया होके, अनंत घडसिंगे, प्रभाकर नरवडे, जुनेद खा पठाण, फैजल मोमीनसह समविचारी पक्ष व संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पान एक वरून

### पून्हा चारशे गाड्यांचा

दाखल झाला होता. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना शिंदे साहेब म्हणाले की, अनिल जगताप यांनी काही महिन्यापूर्वी पहिल्यांदा बीडमधून पाचशे ते सहाशे गाड्यांचा ताफा मुंबईत आणून रात्री दीड वाजता आपला स्वतःचा शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश केला तर आता जगताप, मुळूक यांच्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली बीडमधून मुंबईत दुसऱ्यांदा चारशे गाड्यांचा ताफा रात्री दोन वाजता येऊन शिवसेनेत ऐतिहासिक प्रवेश करत आहे याचे मला कौतुक वाटते. राज्यातील महायुती सरकार हे सर्वसामान्य लोकांसाठी काम करणारे सरकार आहे. गेल्या दोन वर्षात घेतलेला प्रत्येक निर्णय हा सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी घेतला आहे. जिल्ह्यात शिवसेनेला अधिक मजबूत करावे अशी अपेक्षा त्यांनी बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि सर्व शिवसैनिकांकडून यावेळी व्यक्त केली. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलमताई गोऱ्हे, आमदार भरतशेठ गोगावले, शिवसेना उपनेत्या सौ.कलाताई शिंदे तसेच शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा

अक्षय कांकरिया आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, कोरोना काळात कोविड योद्धे म्हणून वृत्तपत्र विक्रेत्यांनी अथकपणे काम केले. नुकतेच बीडमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांचे काम करताना अपघाती निधन झाले. त्या घटनेतून धडा घेऊन आपण विमा काढण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी विक्रेत्यांना रेनकोटचे वाटप केले होते. यापुढेही आवश्यक ते सहकार्य केले जाईल. विमा संरक्षण देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे मत डॉ.क्षीरसागर यांनी व्यक्त केले. यावेळी बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे संस्थापक सचिव परमेश्वर खरात, अध्यक्ष सुमूर्ती वाघिरे, सचिव विद्याभूषण बेदरकर, कार्याध्यक्ष गणेश भालेकर, कोषाध्यक्ष अमित सासवडे, उपाध्यक्ष प्रतिक भोंडवे, सदस्य अभिनंदन बेदरकर, गणेश घोलप, मधुकर सातपुते, राजेश बाभुळगावकर, डी. एस. कुलकर्णी, श्रीराम जाधव आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचलन राहुल गिरी यांनी केले. आभार विद्याभूषण बेदरकर यांनी मानले. यावेळी संपादक, पत्रकार, वृत्तपत्र वितरक, विक्रेते उपस्थित होते.

### अभिवादन करण्यासाठी

असे स्व.मेटे साहेब यांचे नेतृत्व होते. त्यांनी अनेक वेळा काळाच्या पुढे जाऊन विकासाची स्वप्न पाहिली दुर्दैवाने त्यांनी पाहिलेली सगळी स्वप्ने प्रत्यक्षात उतरली नाहीत. परंतु त्यांचा प्रस्थापितांच्या विरोधातील लढा मग तो रस्त्यावर असो किंवा सभागृहात तो कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या स्मरणार्थ उद्या जिल्हाभरातून आणि महाराष्ट्रातून त्यांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्यावर प्रेम करणारे चाहते आणि शिवसंग्रामचे कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसंग्राम च्या वतीने करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांना सरसकट

ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी खरीप पिक हंगाम २०२३ मध्ये ई–पीक पाहणी केलेली नाही, असे शेतकरी या ठिकाणी अनुदानापासून वंचित राहणार आहेत. या अटीमुळे गेवराई तालुक्यातील हजारो शेतकरी या अनुदानापासून वंचित राहणार आहे. दरम्यान ई–पिक पाहणीबाबत बहुतांश शेतकरी यांना माहिती देखील नाही, तसेच ज्यांना माहिती त्यांना सर्वर डाऊन तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे ई–पिक पाहणी करता आलेली नाही. त्यामुळे ई–पिक पाहणीची अट शासनाने रद्द करुन शेतकऱ्यांना सरकसकट अुनदान देण्यात यावे, अशी मागणी मयुरी बाळासाहेब मस्के यांनी केली आहे.

### निवडणुपूर्वी 'नगर'चे 'अहिल्यानगर'

न्यायालयाने अशा प्रकरणांवर तोडगा काढावा असे म्हटले जाते.सर्वोच्च न्यायालयाने औरंगाबादचे 'छत्रपती संभाजीनगर' आणि उस्मानाबादचे 'धाराशिव' असे नामांतर करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळली आहे. न्यायमूळख हृषीकेश राय व न्या. एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. पण ज्या यंत्रणांकडे नावे देण्याचा अधिकार आहे, त्यांना नावे बदलण्याचाही अधिकार आहेच. नेमका हा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात ठळकपणे नमूद केला आहे. त्यामुळे औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आम्हीही कायम ठेवत आहोत. महाराष्ट्र सरकारने नामांतराची प्रक्रिया योग्य पद्धतीने पार पाडली आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले

### विमा कंपनीला फैलावर

श्रीमती नीता शिंदे, श्रीमती पाटील, भारतीय कृषी विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक श्री सावंत यांच्यासह अधिकारी आदी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीकविमा मिळावा यासाठी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पीकविमा कंपनीसमवेत बैठका घेऊन वेळोवेळी विमा वितरणाची व्यवस्था केलेली आहे. मागच्या १५ दिवसात राज्यस्तरावर आयोजित आजची दुसरी बैठक होती; कोणतेही कारण न देता शेतकऱ्यांचा पीकविमा नाकारल्यास प्रसंगी विमा कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची देखील तयारी धनंजय मुंडे यांनी दाखवली होती. पावसाचा खंड, दुष्काळाचे निकष अशा तांत्रिक बाबीत अडचणी येताच मुंडेंनी कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, हवामान तज्ञ यांची मदत घेऊन विमा कंपनीस पीकविमा देण्यास भाग पाडले. दरम्यान कोणतेही कारण न देता नाकारलेले विमा अर्ज मंजूर करून त्या विमा रक्कमा सुद्धा कंपनीस शेतकऱ्यांना ३१ ऑगस्ट पूर्वी द्याव्या लागणार आहेत.

# पान सहा वरून

### विश्वासाला तडा

वाटचाल सुरू आहे. बीडचे लोकप्रतिनिधी सत्तेत असताना काहीही करू शकले नाहीत. अनेक कामे कागदावर झाली तर काही दर्जाहीन झाली. विशेष असा एखादा प्रकल्प बीडचे लोकप्रतिनिधी आणू शकले नाहीत, असा आरोप त्यांनी केला. पुढे ते म्हणाले की, बीड विधानसभा मतदारसंघात असलेल्या इच्छुकांपैकी आपले संघटन सर्वात मजबूत आहे. त्यामुळे आपल्याला संधी मिळाल्यास विजय कुणीही रोखू शकत नाही. आपण आरोग्य शिबीर, स्वयंरोजगार मेळाव्यातून शेकडो लोकांना लाभ देत आहोत. कार्यकर्त्यांनी देखील लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करावेत. जिथे अडचण येईल, ते प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबध्द आहे. नव्याने पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेतली जाईल. येत्या काळात आपली साथ मोलाची ठरणार आहे, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक बबन वाघमारे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ज्येष्ठ नेते अशोक सोनवणे यांनी मानले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिजाऊ मल्टीस्टेट

प्रकरणात अडकले. पो.नि खाडे यांनी सुरवातीपासून मुख्य आरोपी शिंदे सह सर्व आरोपींना अप्रत्यक्षपणे मदत केली. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनी वांढरे व बबन शिंदेचा मुलगा मनीष शिंदे अंतरिम जामीनवर उजळ माथ्याने फिरत आहेत. ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने तपास न झाल्याने ठेवीदार बांधव संतप्त आहेत. यापूर्वी अनेकदा पोलीस अधीक्षक व वरिष्ठांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले. मात्र याबाबत गंभीर पाउल पोलीस प्रशासनाने उचलेले नाही. नूतन पोलीस अधीक्षका मार्फत न्याय मिळवण्यासाठी ठेवीदारांनी नूतन पोलीस अधीक्षकाकडे धाव घेतली. पोलीस अधीक्षक श्री बारगळ यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या कामाचा अनुभव असल्याने जिजाऊ माँसाहेब ठेवीदारांना न्याय देण्यासाठी निश्चित सहकार्य लाभेल अशी अपेक्षा ठेवीदारांकडून व्यक्त केली जात आहे.

### जलजिवनची महीती

बाबत पाणीपुरवठा उपविभागीय अधिकारी पंचायत समिती केज यांच्या कडे माहिती अधिकार देण्यात आला असून पंचायत समिती उपविभागीय अधिकारी उत्तर देत नाही त्यामुळे केज पंचायत समिती मध्ये विहीर योजनेचा महाघोटाळा आहे असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.

### शेकापचा झेंडा विधानसभेत

प्रश्नावर सातत्याने लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाला आणि शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराला शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी विधानसभेत पाठवण्याचे अवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई ड.नारायण गोले पाटील यांनी माजलगाव मतदार संघातील लुखेगाव व मनुर येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना दि.१३ ऑगस्ट रोजी केले. यावेळी लुखेगाव व मनुर येथील शेकडो शेतकरी, कष्टकरी, कामगार बांधव उपस्थित होते.

### औषधी वनस्पतींचे मूलद्रव्यात्मक

करावेत असे सुचविले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, सर सय्यद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर ,यांनी औषधी वनस्पतीचे संवर्धन त्यातून मिळणारा रोजगार याविषयी सखोल मार्गदर्शन केले. पाचव्या सत्रमध्ये प्रमुख वक्ते डॉ. पूजा सूर्यवंशी, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, भुमरडी महाविद्यालय बिदर, कर्नाटक यांनी औषधी वनस्पतींचे मूलद्रव्यात्मक विश्लेषण आणि त्यातून संशोधनाची तयार होणारी नवीन प्रवाह याविषयी सखोल मार्गदर्शन केले . या सत्रचे अध्यक्ष डॉ. अनिल क्षीरसागर सर, वनस्पतीशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय कन्नड छत्रपती संभाजीनगर , यांनी वनस्पतीमध्ये आढळून येणारे विविध मूलद्रव्य व त्याची मानवी जीवनासाठीची परिणामकारकता याविषयी सखोल मार्गदर्शन केले. व्याख्यानमालेच्या सहाव्या सत्रमध्ये प्रमुख निमंत्रित मार्गदर्शक डॉ. संदीप चव्हाण, जैवतंत्रज्ञान विभाग, मायको क्लिनिक अमेरिका यांनी अनु रेणू आधारित संशोधन पद्धती विज्ञानातील जैविक संरचनेचे वास्तविक स्वरूप उलघडण्यास मदत करते याविषयी आपले मत व्यक्त केले. या सत्रचे अध्यक्ष डॉ. संजय दळवी, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, श्री बुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा, जिल्हा परभणी, यांनी जीवविज्ञान शास्त्रामधील नवीन संशोधन हे अनुरेणू आधारितच असायला पाहिजे, जेणेकरून त्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळते याविषयी आपले मत व्यक्त केले. प्रोफेसर विजय कोठेकर जीवविज्ञान व्याख्यानमाला २०२४ चा समारोप दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी आभासी पद्धतीने संपन्न झाला. समारोपाचे प्रमुख पाहुणे प्रोफेसर राजेंद्र सातपुते, संचालक , शासकीय विज्ञान संस्था छत्रपती संभाजीनगर यांनी विज्ञानातील नवीन प्रवाह संशोधण्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्राकडे वळावयास हवे, सहभाग नोंदवावा याविषयी नवसंशोधकांना आवाहन केले. सदरील व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. ताराचंद होळंबे कै. शंकराव गुट्टे वरिष्ठ महाविद्यालय,धर्मापुरी डॉ. माधव फावडे सर, प्राचार्य बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज व प्राचार्य शिवानंद क्षीरसागर सर, श्रीमती केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालय बीड व प्राचार्य सुनील पवार सर, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जिल्हा धाराशिव यांनी आयोजकांना सहकार्य करून व्याख्यानमाला यशस्वी पणे पार पाडण्यासाठी परवानगी दिली व सहकार्य केले या व्याख्यानमालेमध्ये भारतातील विविध राज्यातील महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापक अशा एकूण ४५० सहभागींनी आपला सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक म्हणून प्रा.डॉ. शीला शिंदे प्रा. डॉ.प्रकाश देशमुख आणि डॉ.शंकर सानप कै प्राध्यापक बांधव, संयोजक महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांचे आभार व्यक्त केले. डॉ.शिवाजीराव गुट्टे साहेब , अध्यक्ष कै. शंकरराव गुट्टे महाविद्यालय धर्मापुरी. यांनी सर्व संयोजकाचे अभिनंदन व कौतुक केले. विज्ञाना आधारित विविध उपक्रम आयोजन करून ते जास्तीत जास्त शाळा महाविद्यालय विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी , प्राध्यापक व संशोधकापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# रोटरी क्लबचे कार्य प्रेरणादायी

## प्रदीप निफाडकर | रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचा समारंभ

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व इनरव्हील क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या पदग्रहण सोहळ्याच्या कार्यक्रम प्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर व रोटरीचे प्रांतपाल माननीय डॉक्टर सुरेश साबू , सहाय्यक प्रांतपाल माननीय विवेक जी गंगणे यांच्या प्रमूख उपस्थितीत वैष्णवी मंगल कार्यालयात पार पडला...रोटरीचे नूतन अध्यक्ष म्हणून रवींद्र कानडे व सचिव म्हणून सौ लता जोशी यांनी पदभार स्वीकारला तसेच इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष म्हणून सो प्राजक्ता गुंडेवार व सचिव म्हणून सौ स्मिता कानडे यांनी पदभार स्वीकारला.



मावळते अध्यक्ष रोटरियन राजेश देशपांडे व सचिव डॉ मधुकर घुबडे यांनी हा पदभार सुपूर्द केला. क्लब चा कारभार अतिशय प्रेरणादायी असल्याचे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो डॉ सुरेश साबू यांनी व्यक्त केले रोटरीच्या बद्दल माहिती दिली प्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर यांनी रोटरी च्या समाजाभिमुख कार्यक्रमांची प्रशंसा केली आणि आपल्या दिलखुलास गझलांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले त्यांनी सादर केलेल्या माझी मुलगी या गझलेने सर्वानाच अंतर्मुख केले कार्यक्रमाची सुरुवात सुंदरश्या, 'इतनी शक्ती हमें दे ना दाता' या गीताने झाली रो डॉ स्वानंद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर मावळते अध्यक्ष रो राजेश देशपांडे यांनी गत वर्षीचा क्लब चा आढावा मांडला अध्यक्ष रो रवींद्र कानडे यांनी सर्वांच्या सहकार्याने यावर्षी क्लब करणार असणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली कवयत्री रो स्मिता लिंबगावकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केलेल्या सूत्र संचालनाने कार्यक्रमाची रंगत वाढली आभार सचिव रो लता जोशी यांनी मानले या कार्यक्रमासाठी माननीय राधाकृष्ण होकें पाटील, माननीय मोहनराव काका सोळंके, माननीय रमेश आडसकर माननीय नारायणराव डक ,माननीय ज्योतीताई डक,मा सुरेंद्र रेदासणी, मा ड विश्वास जोशी , ड भानुदासरावजी डक, डॉक्टर सुरेश साबळे, डॉक्टर यशवंत राजेभोसले ,अमरनाथ जी खुर्पे ,माननीय प्रकाश दुगड यांच्या सह मोठ्या प्रमाणात माजलगाव व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती..

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व इनरव्हील क्लबचे सर्व सदस्यांचे उपस्थिती होती.पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने ,पर्यावरण पूरक कापडी पिशवींचे वाटप करण्यात आले,शिरूर येथील सर्पराज्ञी प्रकल्पाचे संचालक सिद्धार्थ सोनवणेआणि सौ सृष्टी सोनवणे यांना भरीव आर्थिक मदत केली गेली तसेच, ग्रामीण भागातील शालेय मुलींसाठी पाच सायकलचे वाटप करण्यात आले.रोटरी क्लब चे मुखपत्र असणाऱ्या दृष्टीक्षेप या बुलेटीनचे प्रकाशन देखील करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन म्हणून डॉक्टर स्वानंद कुलकर्णी यांनी काम पाहिले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी डिस्ट्रिक्ट सदस्य सुरेश भानप साहेब , सहाय्यक प्रांतपाल डॉक्टर शंकर जुजगर,गोविंद भाऊ बजाज, निरंजन वाघमारे, दिगंबर महाजन, डॉक्टर अर्चना पवार ,डॉक्टर अंजली अकोलकर यांच्यासह सर्व रोटरी सदस्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीतानंतर सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लोकेशन करणारे वाहने जप्त

**दणका : नायब तहसीलदार सोनवणेंची धाडसी कारवाई**



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन फाट्यावर महसूल व वाहतूक शाखेचे पथक गस्त घालत असतांना त्यांचा पाठलाग करर्नाया चार मोटार सायकल व एक काळ्या रंगाची स्कॉर्पिओ या पथकाने जप्त केली आहे तसेच ही अनाधीकृत वाळू वाहतूक यांचे लोकेशन करत असल्याची माहिती महसूल व वाहतूक शाखेचा वतिने देण्यात आली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,जिल्हाधिकारी अविनाश पाठक व पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ हे एक्शन मोडमध्ये आले आहेत तसेच त्यांनी वाळू माफियावर कार्यवाई करण्या संदर्भात कडक सुचना दिल्या आहेत त्या अनुषंगाने महसूल व वाहतूक शाखा ही अलर्ट झाली आहे त्यांनी( दि ११ ) रोजी दहा च्या दरम्यान गस्त घालत असतांना राक्षसभूवन फाट्यावर त्यांच्या गाडीचा पाठलाग करनारे वाळू माफियांचे लोकेशन करनारे चार वेगवेगळ्या कपंनीच्या मोटार व एक काळ्या रंगाची स्कॉर्पिओ या पथकाने जप्त केले आहेत तसेच या कार्यवाईत १३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तसेच ही वाहने पुढील कार्यवाईसाठी गेवराई पोलिस ठाण्यात लावण्यात आलेली आहेत. सदरची कार्यवाई ही जिल्हाधिकारी अविनाश पाठक,उप विभागिय अधिकारी कविता जाधव,पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ,तहसिलदार संदिप खोमणे,यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसिलदार संजय सोनवणे,सपोनि सुभाष सानप वाहतूक शाखा प्रमुख,तलाठी अनिल काटे, विशाल काटे, विशाल गायके, सुशांत गरूडकर,विजय अरसूडे,श्रीराम भोसले सह आदिंनी केली आहे.

# बीडमध्ये मोफत आरोग्य तपासणी

## उपक्रम : शहर पोलीस,विश्व हॉस्पिटची माहिती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहर पोलीस स्टेशन आणि विश्व हॉस्पिटल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व पोलीस बांधव आणि नागरिकांसाठी मेंदू,मनका व नसाचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर आणि छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ ज्ञानेश्वर देशमुख हे रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ,जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, श्री श्री विश्वंभर गोल्डये, उपविभागीय पोलीस अधिकारी बीड आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ अविनाश देशपांडे हे राहणार आहेत.

शबिरामध्ये मेंदू, मनका व नस संदर्भातील सर्व विकाराची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. या शिबिराचे आयोजन विश्व हॉस्पिटल व बीड शहर पोलीस स्टेशन हे करत आहेत. बऱ्याचदा पाठीच्या मणक्याच्या मानेच्या दुखण्याकडे साधारण दुखणे आहे म्हणून दुर्लक्ष केल्या जाते आणि तज्ञ डॉक्टरच्या अभावी त्यावर उपचार सुद्धा व्यवस्थित होत नाहीत हे ओळखून आणि पोलिसांसोबत सामान्य जनतेचा जनसंपर्क वाढावा, लोकांच्या मनातील पोलिसांची भीती कमी व्हावी, पोलीस हे लोकांच्या सेवेसाठीच आहे, यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे.स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले आहे.

# झेडपी केंद्रीय शाळेत तिरंगा रॅली




पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही १५ ऑगस्ट ला साजरा होणारा स्वातंत्र्यदिन अधिक संस्मरणीय ठरणार आहे. यावेळी सर्व सरकारी आणि खाजगी शाळांमध्ये १३ ते १५ ऑगस्ट कालावधी प्रत्येक घराघरात तिरंगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर आपेगाव येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून घरोघरी तिरंगा लावा अशा घोषणा दिल्या. या तीन दिवसात शालेय स्तरावर प्रश्नमंजुषा स्पर्धा विविध देशभक्तीपर कार्यक्रम घेण्यात येणार आहे.१५ऑगस्ट रोजी देशभक्तीपर गाणे, नाटक आदी कार्यक्रम होणार आहे. या तिरंगा रॅलीत आपेगावचे सरपंच पांडुरंग औटे,शालेय समितीचे अध्यक्ष कल्याण औटे ,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती खोसे, उपाध्यक्ष मारुती औटे ,ज्ञानेश्वर औटे ,कल्याण वाघ, ग्रामपंचायत सदस्य राम औटे ,अभिजीत औटे, पाणीपुरवठा सहाय्यक परमेश्वर औटे यासह गावातील नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनालाच शालेय गणवेश नाही !

## आक्रमक:शिक्षण विभागासमोर घुलेंचे आंदोलन

संगमनेर/पुण्यभूमी प्रतिनिधी




मोफत शालेय गणवेश अंतर्गत संगमनेर तालुक्यातील २६ पैकी २२ केंद्रातील मुलांना शालेय गणवेश मिळालेला नाही त्या मुलांना वेळेत गणवेश मिळण्यासाठी छात्र भारती संघटनेच्या वतीने अनिकेत घुले यांनी संगमनेर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन केले.भारतीय स्वातंत्र्य दिन १५ऑगस्ट दोन ते तीन दिवस राहिला असताना शालेय मुलांना अजूनही शासनाचा मोफत गणवेशातील गणवेश मिळालेला नाही अनेक लहान मुले गणवेश नसल्यामुळे नैराश्यात आहेत महाराष्ट्र शासनाने गाजावाजा करून शालेय मुलांना मोफत गणवेश योजनेचा डोंगरा पेटला होता अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील २६ पैकी २२ केंद्रातील मुलांना शालेय गणवेश नाही ही मोठी खेदाची व चिंतेची आहे.

१५ऑगस्ट पर्यंत मुलांना शालेय गणवेश मिळत नसेल तर शिक्षण विभाग या घटनेकडे किती गंभीर्याने पाहत आहे हे दिसून येते शालेय गणवेश मिळत नसल्यामुळे अनेक विद्यार्थीनी शाळेत येणे बंद केले आहे अनेक पालकांनी शिक्षण विभागाच्या गलथानपणा वर नाराजी व्यक्त केली आहे१५ ऑगस्ट कोणत्या ड्रेसवर साजरा करायचा हा मोठा प्रश्न शालेय विद्यार्थ्यां व पालकांवर पडलेला आहे छत्र भारतीचे अनिकेत घुले यांनी शिक्षण विभागा समोर आंदोलन केले असता त्यांच्या आंदोलनाची दाखल घेत शिक्षणाधिकारी यांनी लवकरात लवकर गणवेश उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले असल्याचे अनिकेत घुले यांनी सांगितले आहे

# पोर्टल नोंदणी अट रद्द करावी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सन- २०२३ खरीप अनुदानासाठी ई-पिक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून सरसगट शेतकऱ्याना प्रती हेक्टर ५००० रुपयांची मदत करण्यात यावी असा सूर सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये मंगळवार पासून उमटला आहे या मागणीसाठी बसपा चे संघपाल सोनवणे यांनी आंदोलनाचा इशारा एका निवेदनाद्वारे कृषी विभागाला दिला आहे या संदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,खरीप हंगाम सन- २०२३ मध्ये सोयगाव तालुक्यात बुतांश भागात कमी पाऊस झाल्याने तसेच सोयाबीन व कापसाचे भाव पडल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते, त्यानुषंगाने झालेल्या नुकसानीसाठी शासनाने शेतकऱ्याना प्रती हेक्टर ५००० रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

परंतु सदर निर्णयात शासनाने ई-पिक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी केलेले शेतकरी सदर अनुदानास पात्र रहाणार असल्याची जाचक आट घातल्याने सोयगाव तालुक्यातील १४ हजार वर शेतकरी सदर अनुदानापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोयगाव सह तालुक्यात मोठ्याप्रमाणात डोंगराळ भाग आहे. सदर ठिकाणी नेटवर्क नसल्याने तसेच पोर्टलचे सतत सर्वर डाऊन असल्याने जवळपास ३०% ते ४०% शेतकऱ्यांची ई- पिक पाहणी झालेली नाही. तसेच ज्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी केलेली आहे त्यामधील १०% शेतकरी यांची नावे अनुदानाच्या यादीत समाविष्ट झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तालुक्यातील मोठ्याप्रमाणात शेतकरी सदर अनुदानापासून वंचित राहणार असल्याने शेतकऱ्यांमधून प्रचंड प्रमाणात रोष व्यक्त करण्यात येत आहे. वरील परिस्थिती पाहता ई-पिक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी करण्याची अट रद्द करून सरसगट शेतकऱ्याना प्रती हेक्टर ५००० रुपयांची मदत द्यावी अन्यथा आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा दिला आहे

# सोयगाव तालुक्यात १६ मतदान केंद्रे वाढले

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदान केंद्राच्या विस्तारात सोयगाव तालुक्यात १६ मतदान केंद्रात वाढ झाली आहे त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सोयगाव तालुक्यात आता ११४ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे

आगामी विधानसभेची प्रारूप मतदान यादी (ता ०६) प्रसिध्द झाली आहे त्यात सोयगाव तालुक्यात सिल्लोड विधानसभा साठी ११ तर ,कन्नड विधानसभा साठी चार असे १६ मतदान केंद्र वाढले आहे विधानसभेची प्रारूप मतदान यादी प्रसिध्द झाली आहे यामध्ये आता (ता २०) आगस्ट पर्यंत यादीत नावे समाविष्ट नसलेल्या व नावात दुरुस्ती साठी( ता २०) आगस्ट पर्यंत कालावधी आहे (ता३०) आगस्टला अंतिम मतदान यादी प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे निवडणूक नायब तहसीलदार हेमंत तायडे यांनी सांगितले आहे.दरम्यान वाढीव मतदान केंद्रात सोयगाव शहरात दोन तर फरदापुरला तीन मतदान केंद्रात वाढ झाली आहे.

**वाढीव मतदान केंद्रे**

जरंडी, पिंपरी, सोयगाव-२,जंगलातांडा,वरखेडी फरदापुर-३,सावरखेडा, हिवरी ही सिल्लोड मतदार संघातील वाढीव केंद्रे असून पहुरी(बु),तिडका,बनोटी तांडा घोसला, नायगाव ही कन्नड मतदार संघात वाढीव मतदान केंद्रे आहेत

# पदोन्नतीच्या अधिकाऱ्यावर महसूलची धुरा

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदली झालेल्या दोन तहसील कार्यालयातील बदली झालेल्या दोन नायब तहसीलदारांच्या जागेवर सोमवारी (ता.११) प्रतिनियुक्तीवर व पदोन्नती वरील दोन नायब तहसीलदारांनी पदभार घेतला त्यामुळे आता सोयगाव तहसील चा कारभार पदोन्नती व प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांवर राहणार आहे

सोयगाव तहसील कार्यालयाचे महसूल एक नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे यांची विभागीय कार्यालयात व पुरवठा अधिकारी नाना मोरे यांची धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तहसील कार्यालयात बदली झाली त्यांच्या जागेवर कन्नड तहसीलचे मंडळ अधिकारी सतीश भदाणे यांची पदोन्नती होऊन महसूल एक जागी नायब व जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रतिनियुक्तीवर आलेले शिवाजी थोटे यांची पुरवठा अधिकारी म्हणून पदभार घेतला आहे सोयगाव तहसील चा पुरवठा विभाग आधीच नवीन शिधापत्रिका व ऑनलाइन नावे समाविष्ट करणे नावे काढणे व जरंडी रेशन दुकानात कमी धान्य पुरवठा करून धान्यात कपात करणे या मुद्द्यावरन चांगलाच गाजला होता त्यासाठी भाजपा च्या शिष्टमंडळाने पुरवठा अधिकारी मोरे यांना घेराव घातला होता त्या प्रकरणात नाना मोरे यांना कारणे दाखवा बजावण्यात आलेल्या होत्या परंतु आता पुन्हा निवडणुकीच्या कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रतिनियुक्तीवर आलेल्या शिवाजी थोटे यांना पुरवठा विभागाचा पदभार दिला आहे तर पदोन्नती मधून आलेल्या सतिष भदाणे यांना महसूल च्या नायब तहसीलदार पदी पदभार घेतला आहे

## सवाल | जनाची नव्हे तर मनाची ठेवावी?

# भुरट्या पुढाऱ्यांना गावचा रस्ता दिसेना?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नागबेट चौक ते गावात जाणारा रस्ता, रस्ता म्हणून राहिलेला नाही. रस्त्यावर पडलेले ठिकठिकाणी खड्डे, साचलेलं पाणी आणि झालेला चिखल यामुळे हा रस्ता पाणंद रस्त्यासारखा देखील राहिला नाही. तसेच आमदारा नमीता मुंदडा यांनी रस्ता मंजूर करून अनेक महीने झाले आहे व परंतु चिंचोली माळी येथील भुरट्या पुढाऱ्यांना आमदार नमीता मुंदडा यांच्या चिंचोली माळी येथे भुरट्या पुढाऱ्यांना आमदार नमीता मुंदडा यांच्या कडुन रस्ता मंजूर असुन रस्त्याचे काम सुरू करा म्हणन्या ऐवढी सुध्दा ऐपत नाही व आमदारा नमीता मुंदडा चिंचोली माळी सर्कल मध्ये आल्यानंतर मुंदडा कुटुंबाच्या पुढारी चप्पला सांभाळायची वेळ भुरट्या पुढाऱ्यांन वर येते काय असा प्रश्न नागरिकांना उपस्थित होत आहे कारण आमदार नमीता मुंदडा भुरट्या पुढाऱ्यांच्या गावचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लाऊ शकत नाहीत तर चिंचोली माळी येथील मुंदडा कुटुंबाच्या पायथ्याशी सतरंज्या उचलणाऱ्या मुंदडा कुटुंबातील एखादा सदस्य चिंचोली माळी येथे किंवा सर्कल मध्ये आल्यानंतर मुंदडा कुटुंबाच्या सदस्याच्या पुढ पुढ करणाऱ्या भुरट्या पुढाऱ्यांनवर व बगलबचच्यांवर मुंदडा कुटुंबातील सदस्याचे पायतन सांभाळायची वेळ येते का काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मधुन भावना व्यक्त केल्या जात आहेत.असं असताना या रस्त्याकडे सर्वांनीच दुर्लक्ष केले आहे.

# ई-पिक पाहणी करुनही नावे नाहीत?

## समस्या : तहसीलदार नेमकं चाललंय काय

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी.

केज तालुक्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणी द्वारे नोंदविलेले कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य प्रति हेक्टर ५००० देण्यात येणार आहे ही मर्यादा जास्तीत जास्त प्रमाणे दोन हेक्टर पर्यंत देण्यात येणार आहे या अर्थसाह्याचे वितरण शेतकऱ्यांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली द्वारे शेतकऱ्यांचे आधार लिंक बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून होणार आहे खरीप हंगाम सन २०२३ मधील ई पीक नोंदणी झालेल्या कापूस व सोयाबीन पिकांच्या शेतकरी याद्या सर्व सेतू केंद्रावर उपलब्ध आहेत तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे सुद्धा प्रसिद्ध करण्यात आले आहेत अनुज्ञय अर्थसहाय्य शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या आधार संबंधी माहितीचा वापर करण्याबाबत त्यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या सहमती पत्र व ना हरकत पत्र सेतू केंद्रावर उपलब्ध आहे परंतु यामध्ये बरेच शेतकरी असे आहेत




सन २०२३ मध्ये ई पीक पाहणी करून सुद्धा यादीमध्ये नावे नाहीत यासाठी शेतकऱ्यांनी काय करावे असा प्रश्न पडला आहे. काही अधिकाऱ्यांना फोन केले असता ते म्हणतात ही यादी वरून आली आहे. ई पीक पाहणी ची नोंद आमच्या सातबारावर सुद्धा आहे तरीसुद्धा यादीमध्ये नाव नाही यासाठी आपण तात्काळ उपयोजना करून शेतकऱ्यांना या अर्थसाह्याचा मोबदला मिळावा अशी चर्चा शेतकऱ्यांमध्ये आहे.

**सुविचार :** संस्कारांच्या तालमीत शिकलेले डाव माणसांना जीवनात कधीच हारू देत नाहीत.

## एकाच बाटलीतले....!

राज ठाकरेंच्या मराठवाडा दौऱ्यादरम्यान आधी धाराशिव आणि नंतर बीडमध्ये राडा झाला. बीडमध्ये आंदोलकांनी राज ठाकरेंच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकल्या आणि त्यांच्या विरोधात नारेबाजी केली. त्यावेळी उपस्थित मनसे कार्यकर्ते आणि आंदोलकांमध्ये वादावादी झाली, पुढे प्रकरण हाणामारीपर्यंत गेले. त्यानंतर संभाजीनगरमध्ये आल्यावर पत्रकार परिषदेत राज ठाकरेंनी आपल्या विरोधात घोषणाबाजी करणाऱ्या लोकांचा मराठा समाजाच्या आंदोलनाशी संबंध नव्हता, हे लोक उबाठा गटाचे होते, असा आरोप केला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ठाण्याच्या दौऱ्यावर आलेल्या उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावर मनसे कार्यकर्त्यांनी नारळ फेकले, त्यांच्या वाहनावर शेण फेकण्याचा प्रयत्न झाला, उद्धव ठाकरेंच्या सभेत घुसलेल्या काही कार्यकर्त्यांनी नारेबाजी करीत त्यांच्या दिशेने बांगड्या फेकल्या, पोलिसांनी वेळीच मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यामुळे पुढचा संघर्ष टळला. राज ठाकरेंनी आपल्या कार्यकर्त्यांच्या कृतीचे समर्थन करीत हे जशास तसे उत्तर असल्याचे म्हटले. मुख्यमंत्र्यांनीही झाला तो प्रकार योग्य नसला तरी चिथावणी देणाऱ्या क्रियेला प्रतिक्रिया मिळतच असते असे म्हणत एकप्रकारे मनसे कार्यकर्त्यांच्या कृतीचे समर्थनच केले. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा वारसा पाहता हे जे काही होत आहे ते निश्चितच समर्थनीय ठरत नाही, परंतु अलीकडील काळात महाराष्ट्रातील राजकारण अतिशय द्वेषपूर्ण झाले आहे, मतभेदाला आता मनभेदाचीही किनार लागली आहे. तुर्तास हा वाद मनसे आणि उबाठा दरम्यान दिसत असला तरी पुढच्या काळात प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते असेच आक्रमक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खरे म्हणजे उबाठाचे कार्यकर्ते असोत, मनसेच असोत की शिंदे सेनेचे असोत, या सगळ्यांचे मूळ एकच आहे. हे सगळे एकाच बाटलीतले आहेत, आक्रमकता हा त्यांचा स्थायीभाव आहे. नेत्याच्या नुसत्या इशाऱ्यावर राडा घालणे हे त्यांचे आवडते काम आहे. भलेही आता नेते बदलले असतील परंतु मूळ स्वभाव बदललेला नाही. त्यांच्या त्यांच्या नेत्यांनाही आपल्या कार्यकर्त्यांच्या या राडा संस्कृतीची चांगलीच जाणीव आहे, परंतु या कार्यकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न करताना कुणी दिसत नाही. संभाजीनगरमध्ये राज ठाकरेंनी माझे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले तर इतरांना सभादेखील घेता येणार नाही, असे सूचक वक्तव्य केले आणि दुसऱ्याच दिवशी मनसे कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावर हल्ला केला. अर्थात नंतर मात्र राज ठाकरेंनी आपल्या कार्यकर्त्यांना आवाहन करीत जशास तसे नव्हे तर जशास दुप्पट उत्तर देता येते, हे तुम्ही दाखवून दिले, परंतु यापुढे असे काही प्रकार करू नका, महाराष्ट्राच्या राजकारणाची प्रतिष्ठा सांभाळण्याचा प्रयत्न करा, पुढे कुणी अंगावर आले तर पुढचे पुढे पाहू असे म्हणत हे सगळे प्रकार थांबविण्यास सांगितले. परंतु हे सगळे प्रकार इथेच थांबतील असे वाटत नाही, येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राजकीय पक्षांमधला तणाव वाढतच जाण्याची शक्यता आहे, त्यात एखाद्या नेत्याने चिथावणीखोर वक्तव्य केले तर त्याला प्रत्युत्तर देण्यास कार्यकर्ते बाह्या खोचून तयारच आहेत. मनसे, उबाठा किंवा शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांना शांततेची, सामोपचाराची भाषा फारशी ठाऊक नाही. खळ्ळखट्याक हीच त्यांची संस्कृती आहे, ती योग्य की अयोग्य हा वादाचा विषय असू शकतो, परंतु या पक्षाची प्रतिमा अशाच आक्रमक कार्यकर्त्यांमुळे मोठी झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. आपल्या मागण्यासाठी उपोषण करणे, सविनय आंदोलन करणे हे शिवसेनेशी मूळ सांगणाऱ्या कार्यकर्त्यांना कधी जमणार नाही. हे मूळचे शिवसैनिक सध्या तीन शाखांमध्ये विभागले गेले आहेत आणि या तीन शाखांमध्येच द्वेषाची, शत्रूत्वाची भावना अधिक दिसून येत आहे. त्यामुळे इकडून अरे झाले की तिकडून कारे होणारच. त्यात या तिन्ही पक्षांना आपले स्वतंत्र अस्तित्व अधिक ठळकपणे निर्माण करायचे असल्याने सोपा मार्ग असलेल्या राडेबाजीचा आधार घेतला जाण्याची शक्यता अधिक आहे. एकनाथ शिंदे सध्या मुख्यमंत्री असल्याने त्यांचे कार्यकर्ते तसे शांत आहेत, परंतु निवडणुकीची दंगल सुरू होईल तेव्हा त्यांच्यातलाही शिवसैनिक उफाळून वर यायला वेळ लागणार नाही. त्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि भाजपचे कार्यकर्ते तितके आक्रमक नाहीत, शक्तीप्रदर्शन करण्याचे त्यांचे मार्ग वेगळे आहेत, त्यांच्या राजकारणाचा बाजच वेगळा आहे, परंतु मनसे, उबाठा आणि शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांचा ते सगळे एकाच बाटलीतले असल्यामुळे व्यक्त होण्याचा मार्ग सारखाच आहे. त्यांना आवर घालण्याची जबाबदारी त्यांच्या नेत्यांची आहे, परंतु नेत्यांनीच मोकळीक दिली तर भविष्यात अजूनही बरेच राडे होऊ शकतात.

## सुवर्ण हाती लागलेच नाही....!

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धा तसे पाहिले तर भारतासाठी निराशाजनक ठरली असेच म्हणावे लागेल. पदक तालिकेत भारताच्या नावावर सहा पदकांची नोंद आहे. मागच्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने आजवरची सर्वोत्तम कामगिरी करताना सात पदके जिंकली होती, त्यामुळे केवळ एकच पदक कमी आहे आणि ही काही अगदीच निराशाजनक कामगिरी म्हणता येणार नाही, अशी समजूत काढली जाऊ शकते, परंतु यावेळी भारताच्या अनेक खेळाडूंनी अगदी पदकापर्यंत पोहचून शेवटच्या क्षणी कच खाल्ली. थोडा अधिक प्रयत्न केला असता, थोडी अधिक मानसिक कणखरता दाखविली असती, मोठ्या सामन्याचे दडपण हाताळण्याचे कसब दाखविले असते तर अजून किमान चार ते पाच पदकांची भर आपल्या खात्यात पडली असती. शिवाय टोकियोमध्ये आपल्या खात्यात एक सुवर्णपदक आले होते, त्यामुळे पदकतालिकेत आपली स्थिती अधिक चांगली होती, यावेळी त्या सुवर्णपदकाने आपल्याला हुलकावणी दिली. विनेश फोगटच्या बाबतीत तो दुर्दैवी प्रकार घडला नसता तर कदाचित ते सुवर्णपदक आपल्याला मिळाले असते. निरज चोप्रा पूर्णपणे तंदुरूस्त असता तर त्यालाही सुवर्णाचा वेध घेता आला असता. पी.व्ही.सिंधू सोबतच चिराग शेट्टी- साईराज जोडीने आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी केली असती तर कदाचित तेदेखील सुवर्णपदकावर दावेदारी करू शकले असते. लक्ष्य सेनदेखील पदकाच्या खूप जवळ पोहचला होता, परंतु शेवटी दुखापतीमुळे त्यालाही पदकापासून वंचित राहावे लागले. सुवर्ण पदक न मिळाल्यामुळे पदकतालिकेत आपण पाकिस्तानच्याही खाली आहोत. एकमेव सुवर्णपदक पटकावित पाकिस्तानने आपल्यापेक्षा वरचे स्थान प्राप्त केले आहे. मुष्टीयुद्ध आणि तिरंदाजी प्रकारातही भारताला पदकाची आशा होती, परंतु या दोन्ही प्रकारात एकही पदक भारताला मिळू शकले नाही. असे असले तरी भारतीय खेळाडूंची या ऑलिम्पिकमधील कामगिरी पाहता थोडे अधिक प्रयत्न, थोडी अधिक जिद्द आणि निर्णायक सामन्यातील दडपण हाताळण्याची हातोटी साध्य झाली तर भविष्यात ऑलिम्पिक सारख्या अतिशय प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारतीय तिरंगा सन्मानाने फडकेल ही आशा बाळगायला हरकत नाही.

### स्टेट लाइन

# पोलादी नेतृत्वाची शोकांतिका...



डॉ . सुकृत खांडेकर
9594224000
sukritforyou@gmail.com

सतरा कोटी लोकसंख्येच्या बांगलादेशाचे सलग पंधरा वर्षे पंतप्रधानपदावर राहिलेल्या शेख हसीना यांना देशभर निर्माण झालेल्या प्रक्षोभापुढे नमते घ्यावे लागले व स्वतःचा जीव वाचविण्यासाठी पलायन करून भारताच्या आश्रयाला यावे लागले. बांगलादेशच्या निर्मितीचे संस्थापक असलेल्या शेख मुजीबूर रहेमान यांची कन्या चार वेळा पंतप्रधानपदावर राहिल्या; पण शेवटी चार सुटकेस घेऊन लष्करी विमानाने ढाका सोडून दिल्ली गाठावी लागली, ही मोठी शोकांतिका आहे.

शेख हसीना या बांगलादेशच्या वीस वर्षे पंतप्रधानपदावर होत्या. त्यांच्या राजकीय जीवनात अनेक चढउतार त्यांनी अनुभवले. विरोधी पक्षांबरोबर संघर्ष केला आणि लष्करी राजवटीचाही जाच सहन केला; पण गेले काही महिने चालू असलेला हिंसाचार, रक्तपात, विशेषतः लक्षावधी विद्यार्थ्यांनी त्यांच्याविरोधात राजधानी ढाकाकडे केलेला लाँग मार्च, झालेली जाळपोळ, गोळीबार, अश्रुधूर या सर्व चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी त्यांना राजीनामा दिल्याशिवाय पर्यायच शिल्लक राहिला नव्हता. अखेर पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन देशाबाहेर पलायन करावे लागले, हा त्यांच्या राजकीय जीवनाचा दुर्दैवी अंत आहे, असेच म्हणावे लागेल.

दि. १५ ऑगस्ट १९७५, या दिवशी लष्कराच्या एका गटाने केलेल्या उठावात बांगलादेशचे पहिले पंतप्रधान व उत्तुंग नेते शेख मुजीबूर रहेमान यांची ढाकामधील त्यांच्या निवासस्थानी हत्या झाली. एवढेच नव्हे तर त्यांची पत्नी, बंधू, तीन पुत्र, दोन सुना, काही नातेवाईक तसेच त्यांचे खासगी कर्मचारी, पोलीस अधिकारी, सेना दलातील एक ब्रिगेडियर जनरल अशा १८ जणांची निर्घृण हत्या झाली. आई-वडील व कुटुंबीयांची हत्या झाली तेव्हा शेख हसीना पश्चिम जर्मनीत होत्या. त्या व त्यांची बहीण रेहाना त्या भयानक नरसंहारातून बचावल्या. या हत्याकांडानंतर हसीना भारतात आश्रयासाठी आल्या व तेव्हा त्या सहा वर्षे भारतात वास्तव्याला होत्या. सन १९८१ मध्ये शेख हसीना बांगलादेशला परत गेल्या तेव्हा आवामी लीगने त्यांचे मोठे स्वागत केलेच, पण त्यांच्या अनुपस्थितीत पक्षाच्या महासचिवपदावर त्यांची नेमणूक केली. शेख हसीना बांगला देशात परतल्या तेव्हा लष्करी शासक मोहम्मद इर्शाद यांनी सत्ता काबीज केली होती. लष्करी राजवटीविरोधात लढणे सोपे नव्हते. १० नोव्हेंबर १९८७ रोजी शेख हसीना यांच्यावरच हल्ला झाला. त्यात आवामी लीगचे तीन कार्यकर्ते ठार झाले. इर्शाद यांच्या लष्करी राजवटीविरोधात हसीना व त्यांची राजकीय विरोधक असलेल्या बेगम खलिदा जिया यांनी संयुक्तपणे आंदोलन केले. देशात लोकशाही आणावी अशी त्यांची मागणी होती. १९९० च्या अखेरीस हसीना व खलिदा या दोन महिलांच्या नेतृत्वाखाली राजधानी ढाकामध्ये हजारो आंदोलक घुसले. अखेर जनतेचा प्रक्षोभ रस्त्यावर उग्रपणे प्रकट होऊ लागल्याने ४ डिसेंबर १९९० रोजी इर्शाद यांना राजीनामा देणे भाग पडले. फेब्रुवारी १९९१ मध्ये झालेल्या निवडणुकीत बांगला देश नॅशनल पार्टीने विजय मिळवला आणि खलिदा जिया पंतप्रधान झाल्या. त्याच वर्षी ३० एप्रिल १९९१ रोजी बांगलादेशाला जबरदस्त चक्रीवादळाचा तडाखा बसला व राज्यात आलेल्या महापुराने १ लाख ४० हजार लोकांचे बळी घेतले. देशात हाहाकार उडाला. शेख हसीना यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी केली. खलिदा झिया सरकारकडून वेळेवर मदत न पोहोचल्याने त्यांनी सरकारचा राजीनामा मागितला. चक्रीवादळ व महापुराच्या संकटाने हसीना यांना मोठे राजकीय बळ मिळाले. १९९६ च्या निवडणुकीत जनतेने हसीना यांच्याकडे पंतप्रधानपद सोपवले. पाच वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी भारताशी व अन्य देशांशी संबंध सुधारले. भारताबरोबर गंगा पाणी वाटपाचा ३० वर्षांचा करारही केला; पण २००१ मध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले व ढाक्यात बेगम खलिदा जिया यांचा बीएनपी, जमात ए-इस्लामी, जातीय पार्टी इस्लामिक ओइक्यो जोटे, असे संयुक्त सरकार स्थापन झाले. जिया यांच्या नेतृत्वाखालील सरकारने भारतातील ईशान्येकडील राज्यातील उल्फासारख्या फुटीरतावादी संघटनांचे समर्थन केल्याने जगातील अनेक देशांनी नापसंती व्यक्त केली. पुढे या सरकारवर भ्रष्टाचाराचे मोठे आरोप झाले व मोठे जनआंदोलनही झाले. सन २००७ मध्ये पुन्हा लष्करी राजवट स्थापन झाली व निवडणुका लांबणीवर पडल्या. लष्करी राजवटीने शेख हसीना यांना जेलमध्ये टाकल्यावर त्यांच्याविषयी लोकांमध्ये सहानुभूती वाढली. सन २००८ मध्ये झालेली निवडणूक शेख हसीना यांनी जिंकली व त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. त्यानंतर बांगलादेशचे भारताबरोबरचे संबंध अधिक दृढ झाले.

२०१४ मध्ये हसीना यांनी पुन्हा सत्ता काबीज केली व त्या शक्तिशाली बनल्या. विरोधी पक्षाला कमजोर करण्याचे काम हसीना करतात, असा आरोप करीत बांगलादेश नॅशनल पार्टीने २०१४ च्या निवडणुकीवर बहिष्कार घातला होता.

सन १९९६ मध्ये शेख हसीना यांचे सरकार स्थापन झाले; पण त्यांच्या पक्षाला बहुमत नव्हते. संसदेत त्यांच्या पक्षाकडे १४० जागा होत्या, तर खलिदा जिया यांच्या पक्षाकडे ११६ जागा होत्या. संसदेत विरोधी पक्ष प्रबळ असल्याने हसीना यांना मनमानी कारभार करता आला नाही. सन २००९ पासून २०२३ पर्यंत त्यांच्या पक्षाकडे मोठे बहुमत होते, संसदेत प्रबळ विरोधी पक्ष नसल्याने त्यांनी संसदेचे रूपांतर एका रबर स्टॅम्पमध्ये केले होते. न्यायपालिका व प्रशासनावर त्यांची पूर्ण पकड होती. माध्यमांवर नियंत्रण होते. विरोधी नेते जेलमध्ये होते. गेली १५ वर्षे हसीना यांची बांगला देशात निरंकुश सत्ता होती. या वर्षी झालेल्या निवडणुकीवर बांगलादेश नॅशनल पार्टीने बहिष्कारच घोषित केला होता. म्हणून निवडणूक एकतर्फी झाली. हसीना यांनी त्यांच्या कारकिर्दीत बांगलादेशात पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्या. महामार्ग, पूल, बंदरांचा विकास, मेट्रो रेल्वे परियोजना परिणामकारक राबवली. व्यापारवृद्धी झाली; पण हसीना यांच्या काळात लोकशाहीचा संकोच झाला. राजकारणात विरोधी पक्षाला त्यांनी जागाच ठेवली नाही. आरक्षणाच्या टक्केवारी वाढविण्याच्या नादात त्या फसल्या. त्यांनी केलेल्या चांगल्या कामाकडे दुर्लक्ष झाले व त्यांची देशात हुकूमशहा म्हणून प्रतिमा तयार झाली. सर्वाधिक काळ पंतप्रधान म्हणून राहिलेली महिला म्हणून त्यांनी जागतिक विक्रम निर्माण केला; पण आरक्षण कोट्याविरोधात झालेल्या विद्यार्थी आंदोलनाने त्यांना सत्तेवरून हटवले. हसीना यांच्या काळात ६०० लोक बेपत्ता झाले, शेकडो जणांची हत्या झाली असाही आरोप केला जातो आहे.

विद्यार्थी आंदोलनाने हसीना यांच्या लोकप्रियतेला ओहटी लागली, दबदबा संपला. सारा देश विरोधात गेला असे वातावरण निर्माण झाले. प्रक्षोभ आवरता येत नाही, विद्यार्थ्यांना रोखता येत नाही, जाळपोळ थांबवता येत नाही, आंदोलकांवर गोळीबार करणे शक्य नाही, लाखो विद्यार्थी ढाका राजधानीत घुसले, तर गृहयुद्ध शिगेला पेटेल, असा लष्कराने इशारा दिला व हसीना यांना राजीनामा देण्याचा सल्ला दिला. बांगलादेशची आयरन लेडी शेख हसीना यांचा ५ ऑगस्ट २०२४ रोजी राजकीय क्षितीजावर अस्त झाला.

### थर्ड अम्पायर

# भारतीय राजकारणातील प्रभावी शब्द 'नॅरेटिव'




जयंत महाजन
9420691420

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आत्तापर्यंत जेवढ्या निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत 'नॅरेटिव' हा शब्दप्रयोग कधीही कानावर येत नव्हता; परंतु गेल्या दहा वर्षांपासून हा शब्दप्रयोग वापरायला सुरुवात झाली व आताच्या लोकसभा निवडणुकीत तर त्याचा अतिरेक झाला. या लोकसभा निवडणुकीत भाजपने सत्ता मिळविली असली, तरी विरोधकांवर मात्र 'नॅरेटिव'चा आरोप केला. विशेष म्हणजे त्याची सुरुवात भाजपने करूनदेखील त्यांचेच डाव शेवटच्या टप्प्यात त्यांच्यावर उलटायला सुरुवात झाली होती. गेल्या दहा वर्षांपासून भारतीय राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या ठराविक माध्यमांच्या कार्यप्रणालीने उभ्या देशाला एका वेगळ्या परंतु अनाकलनीय विश्वात नेऊन ठेवले होते. त्याचा अतिरेक झाल्यानंतर भारतीय जनतेनेच त्यांना लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाद्वारे सत्य दाखवून दिले. आज उभ्या भारतामध्ये विरोधी पक्ष आघाडीने म्हणजेच 'इंडिया' आघाडीने एक 'नॅरेटीव' सेट केले होते, म्हणून विरोधी पक्षाने लोकसभेत इतक्या मोठ्या प्रमाणात मुसंडी मारली, अशा प्रकारचे 'नॅरेटीव' पराभूत मानसिकतेत असलेले सत्ताधारी करत आहेत. महाराष्ट्रातील भाजपचे नेते प्रामुख्याने देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दरेकर, आशिष शेलार व प्रसाद लाड सारखी मंडळी अशा प्रकारची विधाने करत, जी पूर्वी त्यांनी केली होती; परंतु पंतप्रधान मोदी कंपूचा 'नॅरेटीव' सेट करण्याचा अनुभव लक्षात घेता, त्यांनी गेल्या दहा वर्षांत भारताच्या विकासाचे नेमके काय केले? याचे उत्तर सापडतच नाही. संसदेत जे काही घडले त्यावरून राजकारणातील सत्तेची बदललेली समीकरणे दिसून येतात. विरोधी बाकांवरून जोरदार घोषणाबाजी होत असताना पंतप्रधानांना आपले म्हणणे मांडण्यासाठी अडीच तास त्रस्त व्हावे लागले. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधानांनी दिलेल्या उत्तरादरम्यान मणिपूरच्या घोषणा होत असताना भारतीय राजकारणातील इतक्या हतबल पंतप्रधानांना बघवत नव्हते. त्याला जबाबदार मोदी यांची गेल्या दहा वर्षांतील 'नॅरेटिव' तयार करण्याची प्रक्रिया त्यांच्याच अंगलट आली. नरेंद्र मोदींनी कथानकाचा राजकीय साधन म्हणून वापर करण्यामध्ये जे काही पुण्य मिळवले होते, ते एखाद्या अष्टपैलू खेळाडूसारखे होते. त्याची सुरुवात झाली २०१४ पासून. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळातील कॅग अहवालाच्या आधारे भ्रष्टाचारात बुडालेले मंत्री गट, गांधी घराण्याची वंशावळ या पृष्ठभूमीच्या विरोधात प्रभावीपणे लढणारे एक वेगळे व्यक्तिमत्व ठरले. त्यामुळे मोदींना दिल्लीच्या तख्तावर अलगद जाता आले. त्यात त्यांनी स्विस बँकेतील काळा पैसा परत आणून प्रत्येक नागरिकाच्या अकाऊंटवर १५ लाख रुपये टाकणाऱ्या जुमला कथनाकावर लोकांनी विश्वास ठेवला. ७० वर्षांत काय केले? या प्रश्नांच्या सरबत्तीवर त्यांनी जनतेची मने जिंकली. २०१९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते आणि असंख्य भाजप समर्थक व्हॉट्सअप ग्रुप मतदारांना एकतर्फी जोडले गेले होते. त्यात लडाखपासून लक्षद्वीपपर्यंत भारत नावाच्या देशाची भावना निर्माण केली. 'अच्छे दिन' बरोबरच 'सर्जिकल स्ट्राइक', 'बालाकोट' यांसारख्या घटनांनी प्रखर देश अभिमान जागृत करण्याच्या कथानकाबरोबरच राष्ट्रीय सुरक्षा या मुद्द्याभोवतीने 'नॅरेटिव्ह' तयार करण्यात आले होते. त्याचबरोबर देशातील प्रादेशिक पक्ष हे देश चालवू शकणार नाही, त्यामुळे संघराज्य पद्धत मोडकळीस येईल हे सांगण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते.

२०२४ मध्ये राम मंदिर व मोदींची वैयक्तिक लोकप्रियता पुरेशी ठरेल म्हणून चारशे पारचा नारा देत महाराष्ट्र, राजस्थान सारखी बिगर भाजपा सरकारे पक्षचोरीच्या माध्यमातून 'मोदी हे तो मुमकिन है!' यासारख्या घोषणांनी वातावरण निर्माण केले होते; परंतु ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ३५ वर्षांखालील असलेला हा देश खरोखरच भूतकाळातील वाद-विवादांमध्ये गुंतून जाईल, की दीर्घकालीन भविष्याच्या दृष्टीकोनामध्ये विचार करेल याबाबत तरुणाईमध्ये संभ्रम असताना, या संधीचा फायदा घेत राहुल गांधी यांनी आपली गुणवत्ता कमावली. 'भारत जोडो' यात्रेचा लाभ घेताना आपल्या कट्टर टीकाकारांनासुद्धा सडेतोड उत्तर दिले. पप्पू, युवराज, शहजादे म्हणून उपहासाने संबोधणाऱ्या मीडिया बरोबरच भाजपलादेखील राहुल गांधींकडे दुर्लक्ष करणे जवळपास अशक्य करून टाकले. त्याचा फायदा घेत मुस्लीम द्वेष करणाऱ्या भाजपला खिंडीत पकडत लोकशाही व संविधान बचावाच्या वास्तव 'नॅरेटिव'च्या जाळ्यात अडकवले. 'मोहब्बत की दुकान' म्हणत सर्व दूर काँग्रेसमुक्त देश, अशी घोषणा देणाऱ्या भाजपाला बहुमताच मागे टाकले व शंभरी पार होत काँग्रेसने भारतीय लोकशाही राजकारणाला नवसंजीवनी दिली. यात अनेकांचे निवडणूक पूर्व चाचणी निकाल फेल ठरले. आजही पन्नास वर्षांपूर्वीच्या आणीबाणीची आठवण करून वास्तविक कोणताही फायदा न होता हिंदुत्वासारख्या मुद्द्यापेक्षा बेरोजगारी, बेकारी व शेतकरी-शेतमजूर, वंचित-आदिवासी यांचे मूलभूत हक्क शाबूत ठेवण्यासाठी काँग्रेस आघाडी कशी गरजेची आहे याचे 'नॅरेटिव' म्हणण्यापेक्षा ती या समुदायाची गरज आहे, हे सिद्ध केले गेले. त्यामुळेच महाराष्ट्रात भाजपा आघाडी आज बॅकफूटवर गेली आहे. 'नॅरेटिव' तयार करण्यात नैपुण्य मिळवलेल्या भाजपाला आज जाणीव झाली असेल, की 'नॅरेटिव' तयार करणे हे दुधारी शस्त्र आहे जे वर्तमानात व भविष्यात आपलाच घात करेल. आता भारतीय राजकारणात 'नॅरेटिव' हा शब्दप्रयोग गुळगुळीत होईपर्यंत ठासून वापरला जाईल हे मात्र निश्चित!

### मनाचिये गुंती

# मनाच्या पत्रिका



वैशाली पाटील
9420350171

आपण ज्या आधुनिक प्रगत समाजात राहतोय त्या समाजात हल्ली लग्नाचा मौसम सुरू झाला, की वधूवरांच्या पत्रिका बघणं, गुण जुळवणं, गुरू, राहू ग्रहांची दशा, इ. बघणं झपाट्यानं वाढीस लागलं आहे.

पूर्वी दिलेला शब्द पाळण्यासाठी, किंवा पाहुण्यातील आहे म्हणून लग्नं व्हायची; पण तेही संसार झाले...रेटले; परंतु तिथे कुठेही पत्रिका आड आली नाही. लग्न संबंध म्हटले, की फक्त मुला-मुलींच्या आई-वडिलांची पुण्याई आणि माणुसकी, संस्कार बघितले जायचे आणि त्या बळावर संपूर्ण पिढी गुण्या गोविंदाने संसार करायची; पण आता पत्रिका बघण्याचे फॅड आले..पत्रिकेतील ३६ गुण जुळले, की खरेच संसार सुरळीत चालतात का? कारण मी अनेक घटस्फोट बघितले आहेत ज्यांनी पत्रिका जुळल्या म्हणून लग्न केले होते...आणि या उलट ज्यांनी पत्रिका न पाहता लग्न केले त्यांचे संसार छान सुरू असल्याचेही बघितले आहेत..बघत आहे. मुळात लग्न म्हणजे दोन भिन्न स्वभावाचे, दोन भिन्न संस्कृतीत वाढलेले जीव एकत्र येऊन सहजीवन सुरू करणारे नैतिक बंधन आहे. त्यामुळे अर्थातच एकमेकांना समजून घेणं, एकमेकांच्या आवडी-निवडी जपणं किंवा त्यांच्या आड अडथळा न बनणं, या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात. मुळात मनाच्या पत्रिका जुळणं आधी महत्त्वाचं असतं; पण काळ बदलला, शिक्षण पद्धती बदलली, प्रगतिशील समाजात राहतोय तरी मानसिकता मात्र परिपक्व होत नाहीय. वाढलेल्या अपेक्षा आणि पुरुषप्रधान संस्कृती यामुळे लग्न जमणं अवघड झालंय आणि झाली तरी ती टिकणं हल्ली अवघड होऊन बसलं आहे....कारण प्रत्येकाला स्वतःचा आणि स्वतःच्या शिक्षणाचा गर्व आहे...जमवून घेणं हा संस्कार जोडप्याला शिकवला जातच नाहीय.

मुळात कर्मकांडे करणं, मुहूर्त बघणं, अशा गोष्टी मानसिक दुबळेपणा, भीती यापोटी केल्या जातात. खूपदा मनातली भीती, अविश्वास याला कुठेतरी स्थैर्य मिळावं यासाठीदेखील काही गोष्टी केल्या जातात. त्यामुळे हा एक मानसिक स्थैर्याचा प्रकार म्हणायला हरकत नाही; पण त्यांच्या किती आहारी जायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.

आजही जर तरुण पिढीदेखील पत्रिका बघणं पसंत करत असेल किंवा त्यावर विश्वास ठेवत असेल तर मात्र अजूनही विज्ञान युग दूर आहे. अजूनही समाज अज्ञानी आहे असंच म्हणावं लागेल; परंतु जोपर्यंत मनाच्या पत्रिका जुळत नाहीत तोवर खऱ्या अर्थाने छत्तीस गुण जुळतंच नाहीत. कागदावरच्या गुणांपेक्षा स्वभावाचे गुण जुळून येणं खूपच गरजेचं असतं. पत्रिका बघायच्याच असतील, तर एकमेकांच्या रक्त तपासणीच्या, इतर शारीरिक व्याधींच्या चाचण्या करून त्यांचे रिपोर्ट बघावेत..शारीरिक आणि मानसिक संतुलन अतिशय उत्तम असणाऱ्यांच्या लग्नाचा घाट घालावा..ज्यांचे मानसिक आरोग्य बळकट त्यांचे वैवाहिक नातेही बळकटच होणार.

थोडक्यात काय तर...संसारासाठी दोन सक्षम मने लागतात; पण आज माणसं लग्न टिकण्यासाठी हव्या असणाऱ्या गोष्टी न पाहता पत्रिका पाहतात आणि त्यावरच जास्त विश्वास ठेवतात. विज्ञान युगातही वेल एज्युकेटेड माणसंही केवळ पत्रिका जुळत नाही म्हणून सर्व बाजूंनी योग्य असणारं स्थळ सोडत असतील, तर खूप अवघड आणि विचार करायला लावणारी गोष्ट आहे..आणि शेवटी प्रश्न उरतोच ...स्थळ चांगलं नाही...पण पत्रिका शंभर टक्के जुळते अशा ठिकाणी लग्न जुळविलं का?...अर्थात सर्वांचं उत्तर नाही असंच असणार...

कारण लग्न ही संकल्पना प्रेमावर, समजुतीवर आणि एकमेकांना दिल्या जाणाऱ्या आदरावरच परिपक्व उभी राहत आलीय..

कोणती पत्रिका बघायची आणि जुळवायची याचा विचार नक्की करा..अजूनही वेळ गेली नाहीय.

### वाचक विचार मंच

## राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान ध्वजस्तंभावरच!


स्वातंत्र्यदिन जवळ आला, की सामाजिक संकेतस्थळांवर आपल्या देशप्रेमाची पावती देण्यासाठी झेंडे घेऊन सेल्फी काढण्यासोबत तिरंग्याच्या रंगाचे कपडे परीधान करून ग्रुप फोटो काढून ते अपलोड करणे, चेहऱ्यावर तिरंग्यासारखे टॅटू काढणे, यांसारखे प्रकार या दिवसांत सर्रासपणे पाहायला मिळतात. तिरंग्याच्या तीन रंगांची या दिवशी इतकी क्रेझ असते की, मिठाईच्या दुकानात तिरंगी पेढे आणि केकच्या दुकानांमध्ये तिरंगी केक्सना विशेष मागणी असते. राष्ट्रध्वजाच्या रंगाचा अशाप्रकारे होत असलेला सुमार वापर पाहिल्यावर राष्ट्रध्वज ही शोभेची वस्तू तर बनली नाही ना? असा प्रश्न पडतो. राष्ट्रध्वज हा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे, त्याचा योग्य तो मान राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे अलिखित कर्तव्य आहे. त्याग, क्रांती, शांती व समृद्धी या मूल्यांची शिकवण राष्ट्रध्वज आपल्याला देतो. उत्साहापोटी राष्ट्रध्वजाच्या रंगाचा गैरवापर करताना आपण ही मूल्येच पायदळी तुडवत असतो. राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान हे ध्वजस्तंभावरच असते. तोच ध्वजाचा उचित सन्मान असतो. सामाजिक संकेतस्थळांवर देशप्रेमाचा देखावा करण्याऐवजी ज्या क्रांतिकारकांनी देशासाठी प्राणार्पण करून स्वतंत्र भारताची ध्वजपताका डौलत ठेवली त्यांचे आदर्श कृतीत आणण्यासाठी प्रयत्न केल्यास तेच खरे देशप्रेम असेल.



**मोक्षदा घाणेकर,**
मुंबई

### गुल्लेर

## धन्य आहेस लेका



नरेंद्र इंगळे
9561226572

'ओ मन्या.. मुकाट्यानं बस.. काहून माजरचं शेपूट ओढून राह्यला?'

'मजा येते.'

'कायची मजा? माजर बोखरली की समजीन तुले.. आज लवकर कसा आला शाळेतून?'

'आमचे गुरुजी गाडीऊन आपटले. पाय मुचकला. शेळके गुरजीनं खिचळी वाटून सुट्टी देली.'

'आन पुस्तक.. मी तुहा अभ्यास घेतो. माह्या नावाचं स्पेलिंग येते काय तुले? शंकरचं स्पेलिंग सांग.'

'एस एच ए यंकर..'

'ससरीच्या.. खिचडी खाऊन भेजा हँग झाला तुहा.. बापाच्या नावाचं स्पेलिंग येत नाही.. तुह्या आईचं स्पेलिंग सांग.'

'सुवरना..'

'इंग्रजीत सांग.'

'एस यू आर यू एना...'

'हद झाली लेका..भुगोलाचं पुस्तक काढ... यातला प्रश्न विचारतो.. आकाशगंगा म्हनजे काय?'

'आकाशातून गंगा वाह्यते तिले आकाशगंगा म्हनतात.'

'धन्य आहेस लेका.. कोनं जन्म देला बे तुले?'

'तुमीच देला.'

'सांग.. आदिमानव कुठी राह्यत होते?'

'त्याच्या घरी राह्यत होते.'

'भारत कधी स्वतंत्र झाला?'

'झेंडावंदन असते त्या दिवशी.'

'आता काय करावं? धड एका प्रश्नाचं उत्तर देता येत नाही.'

'मराठी येते मले.'

'वाक्यात उपयोग सांग. हातावर तुरी देने..'

'मी पिंट्याच्या घरी गेलो तवा त्याच्या आईनं हातावर तुरीच्या घुगऱ्या देल्या.'

'आता काय डोकसं आपटू तुह्यापुढे?'

'टेंशन घेऊ नका..गुरुजी म्हनतात आठवीलोक फिकर करुनका.. सगळे पास होतात.'

'मंग दहावीत काय दिवा लावशीन? दहावीत बोर्डाची परीक्षा असते. अभ्यास करा लागते. सरकार म्हनते आठवीलोक लोटून द्या अन दहावीत कडक परीक्षा घ्या.. म्हनजे भावी पिढीचा सत्यानाश.. याले म्हनतात मेरा भारत महान!'

### गौरवगाथा

विनेश तुझ्या कष्टाचं
ज्यांना समजलं नाही मोल
म्हणून ते सर्व करताहेत
तुला हल्ली ट्रोल

मूठभर सोडले तर
सर्वांची संवेदना जागी आहे
तुझ्या दुःखात आपला
संपूर्ण देश सहभागी आहे

हिरावल्या गेलं पदक
जरी केले कट-कारस्थान
तरी कमी झाला नाही
तुझ्याबद्दलचा सन्मान

काळजाची जखम ओली
डोळ्यांची कड ओली
जगामध्ये भारताची
तू मान उंचावून आली

**ॲड. अनंत खेळकर,**
अकोला

### प्रासंगिक

## भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई



भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज जयंती आहे.आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात जागतिक महासत्ता बनत आहे. याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२वी नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४५ साली ते ब्रिटनला गेले. तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते; पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते. शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली. त्या जागेचे महत्त्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रक्षेपण करण्यात ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले; पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या असे आवाहन त्यांना केले. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. त्यांनी तज्ज्ञ संशोधकांची एक टीम बनवली.त्यांच्या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. डॉ. विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबादच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,** दौंड, जि. पुणे
मो. नं.: ९९२२५४६२९५

## बांगलादेशच्या अल्पसंख्याकांसाठी मोठे पाऊल

### सीमेवरील स्थितीवर नजर ठेवण्यासाठी समिती स्थापन

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** बांगलादेशातील सद्यस्थिती पाहता भारत सरकार सतर्क आहे. आता केंद्र सरकारने तेथील अराजकता पाहून मोठे पाऊल उचलले आहे. बांगलादेशला लागून असलेल्या सीमेवर नजर ठेवण्यासाठी सरकारने एका समितीची स्थापना केली आहे. बीएसएफच्या पूर्व कमांडच्या अतिरिक्त महासंचालकांना या समितीचे अध्यक्ष करण्यात आले आहे. ही समिती बांगलादेशात राहणारे भारतीय, हिंदू आणि अन्य अल्पसंख्याक समुदायांची सुरक्षा सुनिश्चित करणार आहे.

बांगलादेशातील स्थिती पाहता मोदी सरकारने बांगलादेशला लागून असलेल्या सीमेवर नजर ठेवण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. ही समिती बांगलादेशातील अधिकाऱ्यांसोबत संवाद राखून तेथे राहणारे भारतीय नागरिक, हिंदू आणि अन्य अल्पसंख्याक समुदायांची सुरक्षा सुनिश्चित केली जाणार आहे.

## पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर बदलला डीपी

वृत्तसंस्था



**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वतःच्या सोशल मीडिया हँडलवरील स्वतःचे डिस्प्ले पिक्चर (डीपी) बदलला आहे. पंतप्रधान मोदींनी विविध सोशल मीडिया हँडल्सवर स्वतःच्या प्रोफाइल पिक्चरमध्ये राष्ट्रीय ध्वज लावला आहे. पंतप्रधानांनी लोकांनाही याचे अनुकरण करण्याचे आवाहन केले आहे. स्वातंत्र्यदिनापूर्वी त्यांनी देशवासीयांना स्वतःच्या डीपीमध्ये तिरंगा लावण्याचे आवाहन केले आहे. स्वातंत्र्यदिन नजीक आला आहे. आम्ही सर्वांनी मिळून हॅशटॅग हर घर तिरंगला एक स्मरणीय जनआंदोलन करूया. मी स्वतःचे प्रोफाइल पिक्चर बदलत आहे आणि तुम्हा सर्वांनाही माझ्यासोबत मिळून आमच्या तिरंग्याचा जल्लोष करण्याचा आग्रह करत आहे असे पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया हँडल एक्सवर नमूद केले आहे.

## वैज्ञानिक उलगडणार जीवसृष्टीच्या निर्मितीचे रहस्य

### समुद्रात १,२६८ मीटर खोल उत्खनन

**वॉशिंग्टन :** पृथ्वीच्या वरच्या स्तरामध्ये १,२६८ मीटर म्हणजे आतापर्यंतचा सर्वांत खोल छेद घेऊन जीवसृष्टीच्या उत्पत्तीबाबतचे नवे पुरावे शोधण्याचे काम सुरू आहे. इतके खोल उत्खनन वैज्ञानिकांच्या एका चमूने समुद्रातील पर्वत अटलांटिस मैसिफच्या क्षेत्रात केले आहे. उत्तर महासागराच्या मध्यभागी असलेल्या या क्षेत्रात पृथ्वीचे आवरण तुलनेने अधिक खुले असते, असे मानले जाते. वैज्ञानिकांनी हा छेद घेऊन खडकाचा एक असा नमुना घेतला आहे, ज्याच्या अभ्यासातून अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली, हे जाणून घेण्यास मदत होईल.



**कल्याण :** मध्य रेल्वेच्या कसारा रेल्वे स्थानकात कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून समाज माध्यमांवर प्रसारित करण्यासाठी चित्रफित तयार करणाऱ्या नाशिक येथील दोन तरूणांना रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी अटक केली आहे. राजा हिम्मत येरवाल (२०), रितेश हिरालाल जाधव (१८) अशी अटक आरोपींची नावे आहेत. ते दोघेही नाशिक येथील रहिवासी आहेत.

## लग्नासाठी पंजाबमधून आलेल्या तरुणीची फसवणूक

### रत्नागिरीतील तरुणाविरोधात गुन्हा दाखल




**रत्नागिरी :** सोशल मीडियावर ओळख निर्माण झाल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून पंजाब चंदीगड येथील तरुणीला रत्नागिरीला बोलावून घेऊन तिची फसवणूक केली. या प्रकरणी तरुणाविरोधात (दि. १०) दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षकुमार यादव (२२) रा. रत्नागिरी) असे गुन्हा दाखल केलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्या विरोधात पीडित तरुणीने शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, जुलै २०२३ मध्ये इन्स्टाग्रामवर संशयित तरुणाची आणि तरुणीची ओळख झाली.

## कानपुरी कोंबड्याने मारली शेजाऱ्याला चोच

### दोन्ही गटांतील पेटले लोक



**कानपूर :** कानपूर शहरात एका कोंबड्याने चोच मारल्याने प्रकरण इतके वाढले की दोन पक्षांमध्ये जोरदार हाणामारी झाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून दोन्ही पक्षांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला मात्र ते यशस्वी झाले नाहीत. त्यावर पोलिसांनी गोंधळ करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली. प्रकरण कानपूरच्या बिथूर पोलीस स्टेशन परिसरातील आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोंबड्यावरून दोन पक्षांमध्ये वाद झाला. काही वेळातच प्रकरण इतके वाढले की दोन्ही पक्षांमध्ये लाठीचार्जही झाला.




### ठाण्यातील राड्यावर मुख्यमंत्री शिंदेंची प्रतिक्रिया

## अ‍ॅक्शनला रिअ‍ॅक्शन मिळणारच!

**ठाणे :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या दौऱ्यादरम्यान बीडमध्ये उद्धव ठाकरेंच्या पदाधिकाऱ्यांनी राज ठाकरे यांच्या गाडीवर सुपाऱ्या फेकल्याचे समोर आले होते. मात्र या घटनेचे पडसाद काल (शनिवार) ठाण्यात उमटल्याचे दिसून आले. ठाण्यामध्ये ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्धव ठाकरेंच्या गाड्यांच्या ताफ्यासमोर मनसेच्या कार्यकर्त्यांनी शेण आणि बांगड्या फेकल्याचा प्रकार घडला आहे. त्यामुळे ठाण्यात राजकीय वातावरण तापल्याचे दिसून आले आहे. या घटनेवर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरेंच्या दौऱ्याच्या वेळेस उबाठा गटाने चुकीचे आंदोलने केली. त्यामुळे अ‍ॅक्शनला रिअ‍ॅक्शन मिळणारच, असे ते म्हणाले आहेत.

सरकार स्थापन झाल्यापासून विरोधक म्हणायचे की, सरकार पडणार मात्र सरकार अजून मजबूत झाले आहे. शिवसेना आणि धनुष्यबाण वाचवण्यासाठी आम्ही असा निर्णय घेतला आहे. लोकसभेमध्ये जर स्ट्राईक रेट पाहिला तर लोकांची पसंती कोणाला आहे, हे आम्हाला सांगायची गरज नाही पडणार. ठाण्यातील लोकांना औषध द्यायला जमते, त्यांनी बरोबर जमलगोटा दिला आहे असेही ते म्हणाले. तसेच दिल्लीतून मातोश्रीमध्ये बैठका होत होत्या, पण आता दिल्लीकडे लोटांगण घातली जात असल्याचे एकनाथ शिंदेंनी प्रत्युत्तर दिले आहे.

### मुख्यमंत्री पदासाठी विचारांशी गद्दारी केली नाही!

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सध्या अनेक लोक बोलत फिरत आहेत की, मला मुख्यमंत्री करा. पण आम्ही तसे कधीच केले नाही. मुख्यमंत्रीपदासाठी आम्ही कधीही विचारांशी गद्दारी केली नाही. तसेच आजही उद्धव ठाकरे ठाण्याच्या मेळाव्यामध्ये दाढीबद्दल बोलले आहेत कारण त्यांना माझ्या दाढीची धास्ती आहे. त्यांना माहिती आहे याच दाढीने आपली गाडी खड्ड्यात घातली आहे. सध्या त्यांना मिमिक्री करणे हेच काम उरले आहे. जर बाळासाहेब ठाकरे असताना त्यांनी अशा प्रकारचे काम केली असती तर बाळासाहेबांनी त्यांना जंगलात फोटोग्राफी करण्यासाठी पाठवले असते, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## मध्य प्रदेशात विमान कोसळले, दोन्ही पायलट जखमी

वृत्तसंस्था



**गुना :** मध्य प्रदेशातील गुना येथे शा-शिब एव्हिएशन अ‍ॅकॅडमीचे दोन आसनी विमान १५२ क्रॅश झाले आहे. चाचणी उड्डाणासाठी दोन वैमानिकांनी त्याच्यासोबत उड्डाण केले. सुमारे ४० मिनिटे उड्डाण केल्यानंतर विमान गुनाच्या आवारात कोसळले. इंजिनमध्ये बिघाड झाल्याने हा अपघात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. कॅप्टन व्हीसी ठाकूर आणि अन्य पायलट जखमी झाले आहेत. कॅन्ट पोलिसांसह अकादमीचे अधिकारी घटनास्थळी हजर आहेत. हे विमान चाचणी आणि देखभालीसाठी गुना येथे आणण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

टीआय कँटचे दिलीप राजोरिया यांनी सांगितले की, अपघातग्रस्त विमान बेळगावी एव्हिएशनचे होते. ते शा-शिब अकादमीमध्ये चाचणी आणि देखभालीसाठी आणले होते. दोन्ही पायलटही बेळगावी एव्हिएशनमधून आले होते. वैमानिक शनिवारीच गुना येथे आले होते. जखमी झालेले दोन्ही पायलट हे हैदराबादचे असल्याचे सांगण्यात येत आहे. दोन्ही वैमानिकांनी चाचणी उड्डाणासाठी विमान उडवले होते, त्यामुळे इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे हा अपघात झाला असण्याची शक्यता आहे. एअरक्राफ्ट कर्नाटक ही संस्था असल्याचे सांगितले जाते.

### अमेरिकेने कट रचून मला सत्तेवरून हटवल - शेख हसीना

**नवी दिल्ली:** शेख हसीना यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन देशातून पलायन केले आहे. त्या सध्या भारतात असून त्यांनी बांगलादेशातील अराजकतेला अमेरिका जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. अमेरिकेनेच त्यांना सत्तेवरून पायउतार होण्यास भाग पाडल्याचे वक्तव्य केले आहे. शेख हसीना यांनी अमेरिकेला सेंट मार्टिन बेट न दिल्यामुळे अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्याची योजना आखली होती, असेही हसीना यांनी म्हटले आहे. बांगलादेशकडून सेंट मार्टिन बेट घेऊन तिथे नौदलाचं व लष्करी तळ उभारण्याची अमेरिकेची योजना होती. ज्याद्वारे अमेरिकेला बंगालच्या उपसागरावर स्वतःचा प्रभाव निर्माण करता आला असता.

## बांगलादेशातील हंगामी सरकारमधील सल्लागार मंडळाचे खातेवाटप

वृत्तसंस्था



**ढाका :** बांगलादेशातील हंगामी सरकारमधील सल्लागार मंडळाचे खातेवाटप करण्यात आले आहे. हंगामी पंतप्रधान डॉ. मोहम्मद युनूस यांनी शुक्रवारी या सल्लागारांचे खातेवाटप जाहीर केले. स्वतः डॉ. युनूस यांच्याकडे संरक्षण खात्याबरोबर अन्य २७ खात्यांची जबाबदारी असणार आहे. माजी परराष्ट्र सचिव मोहम्मद तौहिद हुसैन यांच्यकडे परराष्ट्र खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

डॉ. मोहम्मद युनूस यांना हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून गुरुवारी शपथ देण्यात आली. त्यांना देशाचे मुख्य सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले असून हे पद पंतप्रधानपदाच्या बरोबरीचे आहे. अन्य सल्लागारांची निवड विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी, लष्कर आणि नागरी समुदायाच्या प्रतिनिधींशी चर्चा करून करण्यात आली आहे. डॉ. युनूस यांच्याकडे संरक्षण, सामान्य प्रशासन, शिक्षण, उर्जा, अन्न, जलस्रोत आणि माहीती मंत्रालयांची जबाबदारी असणार आहे. तर लष्करातील निवृत्त ब्रिगेडिअर एम सखवात हुसैन यांच्याकडे गृह खाते सोपवण्यात आले आहे.

## पंजाब मेलमध्ये आग लागल्याची अफवा

### प्रवाशांनी ट्रेनमधून मारल्या उड्या


वृत्तसंस्था



**बरेली :** हावडा येथून अमृतसरच्या दिशेने जाणाऱ्या १३००६ पंजाब मेल एक्स्प्रेसच्या जनरल डब्यात आग लागल्याची अफवा पसरली. यामुळे प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली. ही घटना सकाळी ८.०० च्या सुमारास घडली. घटनेच्या वेळी ट्रेन ताशी ५० किमी वेगाने धावत होती. अफवामुळे चेंगराचेंगरी झाली. यात २० प्रवासी जखमी झाले असून ७ जणांची प्रकृती चिंताजनक आहे.

रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, पंजाब मेल एक्स्प्रेस बरेली जंक्शनवरून शाहजहांपूरच्या दिशेने निघाली. बिलपूर आणि मीराणपूर कटरा स्थानकांदरम्यानच्या जनरल डब्यात आग विझवणारा गॅस सिलेंडर अचानक जमिनीवर पडला. सिलिंडरमधून गॅस बाहेर येऊ लागला. त्यानंतर डब्यात आग लागल्याची अफवा प्रवाशांनी पसरवली. त्यामुळे डब्याच्या गेटवर प्रवाशांनी चालत्या ट्रेनमधून उड्या मारायला सुरुवात केली. त्यानंतर शाहजहांपूर रेल्वे स्थानकावरील प्लेटफॉर्म क्रमांक एकवर ट्रेन थांबवण्यात आली. रेल्वे अधिकारी आणि आरपीएफचे जवान पोहोचले. पाच रुग्णवाहिका बोलावण्यात आल्या. अपघातात गंभीर जखमी झालेल्या सात जणांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, ट्रेन ३० मिनिटे थांबली होती. तपासानंतर ही ट्रेन रवाना करण्यात आली.

## चक्क भुताने एफआयआर नोंदविला; न्यायमूर्तींना जबरदस्त धक्का बसला




**अलाहाबाद :** येथील उच्च न्यायालयात चक्क भूत तक्रारदार असलेल्या असामान्य प्रकरणाची सुनावणी पार पडली आहे. एका व्यक्तीने स्वतःच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनी फसवणूक आणि बनावट दस्तावेजाचा एफआयआर दाखल केल्याचे हे प्रकरण आहे. पुरुषोत्तम सिंग यांनी त्यांच्यासह चारजणांविरुद्ध फसवणूक व बनावट दस्तावेज तयार केल्याचा गुन्हा रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. त्यांच्यावर शब्द प्रकाश यांनी जमिनीच्या वादातून खोटा गुन्हा दाखल केल्याचा त्यांचा दावा होता. शब्द प्रकाश यांच्या वतीने अधिवक्ता विमलकुमार पांडे यांनी १९ डिसेंबर २०२३ रोजी ममता देवी यांच्या स्वाक्षरीने हायकोर्टात वकालतनामा दाखल केला आहे.

## मला भाजपमुक्त राम हवा, फक्त तीन महिने थांबा!

### उद्धव ठाकरे यांचा इशारा



**ठाणे :** शिवसेना (यूबीटी) प्रमुख आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी ठाण्यात आपल्या समर्थकांना संबोधित केले. यावेळी त्यांनी अनेक मुद्यावर भाष्य केले. लाडकी बहीण योजनेचा सर्व महिलांनी लाभ घ्या, हे तुमच्या हक्काचे पैसे आहे. राज्यातील महिलांनी स्वाभिमानातून तडजोड कडू नये असे आवाहन त्यांनी केले. थंयक्त झालेल्या दगडफेक ते म्हणाले, मला भाजपमुक्त राम हवा आहे. फक्त तीन महिने थांबा, मी त्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना अशा ठिकाणी पाठवतो, मुंबई ,ठाणे माझे, कोकण माझे असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी इशारा दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले, मी तमाम गुजरातींच्या विरोधात नाही. त्यांनी माझा पक्ष, माझे निवडणूक चिन्ह चोरले आणि आता मुनगंटीवार लंडनला जाऊन वाघनख आणले. आधी १५ लाख देणार होते, १५ लाखांचे काय झाले? बंधू-भगिनींनो. जे बोलतील ते कुठे आहेत? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. सर्व काही गुजरातला जाते, पण एक मोठा प्रकल्प गुजरातमध्ये गेला आहे. आम्ही भिकारी आहोत का? आम्ही भिकारी नाही, तुम्ही आम्हाला १५०० रुपये (मुलगी बहिण योजना) देत आहात. १५०० रुपयात काय होते? १५०० रुपये देऊन घर चालवता येईल का? तुम्ही १५०० रुपयांना पुस्तकेही विकत घेऊ शकत नाही आणि त्याशिवाय पुस्तकांवर जीएसटी आहे. एकापाठोपाठ एक सगळे प्रकल्प गुजरातला जात आहेत. असा आरोपही उद्धव ठाकरेंनी केंद्र सरकारवर केला आहे.

### मृत्यूनंतरही मरण यातनाच वाट्याला

**मोखाडा :** इतकेच मला जाताना सरणावर कळले होते 'मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते' सुरेश भटांनी या कवितेतून मरणही सुसह्य असल्याचे सांगितले असले तरी धामणशेत कोशिमशेत ग्रामपंचायतमधील फणसपाड्यावरील आदिवासी बांधवांसाठी स्वातंत्र्याची ७७ वर्ष उलटल्यानंतरही स्मशानभूमी नसल्याने अक्षरशः उघड्यावर अंत्यविधी करावा लागतो आहे.

## एमबीबीएस विद्यार्थ्यास न्यायालयाचा दिलासा

### हजेरीपट कमी तरी परीक्षेस बसण्यास मोकळीक

**पणजी :** एमबीबीएस प्रथम वर्षात एका विषयात आवश्यक हजेरीपट कमी असल्यामुळे विद्यार्थ्याला परीक्षेस बसण्यास मज्जाव केला होता. या प्रकरणी गोवास्थित मुंबई उच्च न्यायालयाने सदर विद्यार्थ्याला परीक्षेस बसण्यास मोकळीक दिली आहे. तर त्याच्या निकाल बंद लिफाफात ठेवण्याचा आदेश जारी केला आहे. या प्रकरणी लक्ष्मी जैन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यात त्यांनी राज्य सरकार, गोवा वैद्यकीय महाविद्यालय, गोवा विद्यापीठ आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला प्रतिवादी केले होते. याचिकादार जैन गोमेकॉच्या प्रथम वर्ष एमबीबीएस वर्गात शिक्षण घेत आहेत. शरीरशास्त्र विषयाची परीक्षा १२ आणि १३ ऑगस्ट रोजी होणार आहे.



**ढाका :** गोपालगंज भागात आंदोलकांनी लष्करावर हल्ला केला ज्यात लष्कराचे पाचहून अधिक जवान जखमी झाले. शनिवारी लष्कराचे जवान आणि अवामी लीग समर्थकांमध्ये झालेल्या जोरदार चकमकीनंतर जमावाने लष्कराचे वाहन जाळले. या घटनेत लष्कराचे जवान, पत्रकार आणि स्थानिक लोकांसह सुमारे १५ जण जखमी झाले आहेत.

## बाल तस्करी! डॉक्टरांनी १४ मुलांची केली विक्री

वृत्तसंस्था

**मुंबई :** या वर्षी एप्रिलमध्ये उघड झालेल्या बाल तस्करीने गेल्या दीड वर्षात देशभरात १४ अपत्यहीन जोडप्यांना विकले, असे मुंबई गुन्हे शाखेने सादर केलेल्या २,००० पानांच्या आरोपपत्रात म्हटले आहे. ५ महिने ते ४ वर्षे वयोगटातील मुलांची एजंट आणि डॉक्टरांच्या चांगल्या नेटवर्कद्वारे ८०,००० ते ७ लाखांपर्यंतच्या रकमेत विक्री करण्यात आली होती. पोलिसांनी तस्करी केलेल्या १४ पैकी ९ मुलांची सुटका केली आहे आणि या प्रकरणाशी संबंधित ३५ जणांना अटक केली आहे, आरोपींच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवून, आरोपपत्रात असे म्हटले आहे की, इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन (IVF) केंद्रांसह अंडी दाता आणि सरोगेट माता हे सिंडिकेट आणि अपत्यहीन जोडप्यांमधील संपर्काचे पहिले बिंदू म्हणून काम करतील.

ते IVF केंद्रांच्या ग्राहकांमधून नवजात बाळ विकत घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्यांना ओळखतील आणि खरेदी करणाऱ्या एजंटांशी संपर्क साधतील, जे फूटपाथ आणि झोपडपट्ट्यांमध्ये फिरतील आणि ज्या गरीब, गरजू महिलांनी अलीकडेच बाळंतपण केले आहे त्यांना त्यांना किंमत देऊन विकायला सांगितले.

### असा झाला सिंडिकेटचा पर्दाफाश

कांता पेडणेकर या महिलेने १३ डिसेंबर २०२२ रोजी विक्रोळी पूर्व येथील शीतल वेअरच्या माध्यमातून आपले पाच महिन्यांचे बाळ विकल्याची माहिती २७ एप्रिल रोजी गुन्हे शाखेच्या युनिट २ मधून मिळाल्यानंतर या सिंडिकेटचा पर्दाफाश करण्यात आला. पेडणेकर यांच्या चौकशीत असे दिसून आले की डॉ खंदारे, होमिओपॅथिक डॉक्टर आणि दुसरी एजंट वंदना पवार यांच्यामार्फत तिचे बाळ रत्नागिरीतील संजय पवार आणि सविता पवार या जोडप्याला २ लाखांना विकले.

### ८० हजार ते ८ लाख रुपयांना सौदा

## दिवसाला ३८ हजार दारूच्या बाटल्यांची विक्री

**पणजी :** राज्यात गेल्या चार वर्षांत दिवसाला सरासरी ३८ हजार ९३२ दारूच्या बाटल्यांची विक्री झाली आहे. या बाटल्यांचा विक्रीतून अबकारी कर स्वरूपात सरकारला दिवसाला सरासरी ४० लाख रुपये मिळाले आहेत. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी विधासभेत दिलेल्या लेखी उत्तरातून ही माहिती मिळाली आहे. याबाबत आमदार कार्लुस फेरेरा यांनी अतारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

# पोलीस मुख्यालय ते पालवण चौक रस्ता होणार!

## बोंबला : एकाकडून श्रेयासाठी उपोषण तर दुसऱ्याकडून मावेजासाठी अडवणूक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलीस मुख्यालय ते पालवण चौक हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी नगरसेवक मोरे, क्षीरसागर, वंचितचे नेते अजय सरवदे, सामाजिक कार्यकर्ते संभाजी सुर्वे यांनी असंख्य निवेदने तक्रारी दिली व आंदोलने केली आहेत. या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडल्याने नितेश उपाध्ये यांनीही आमरण उपोषण केले आहे प्रशासनाकडून तोंडी आश्वासन मिळाले पण कारवाई झाली नाही.

सदरील रस्त्याचे काम भूसंपादन कारवाईमुळे थांबलेले आहे तसेच प्रकरण मा. उच्च न्यायालय छत्रपती संभाजी नगर याठिकाणी दाखल असून मा.न्यायलायचा आवमान होऊ नये म्हणून प्रशासन खड्डे बुजविण्यासाठी टाळाटाळ करत आहे. तात्काळ भूसंपादन प्रक्रिया राबवावी अशी मागणी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

धानोरा रोड परिसरातील नागरिकांची दयनीय अवस्था पाहून मुख्यधिकारी अंधारे मॅडम यांनी दखल घेत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत बीड नगर परिषद डी.पी. रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट रस्ते व पक्की नाली बांधकाम करुन सुधारणा करणे ता.जि बीड येथील एकूण १७ कामाचा प्रस्ताव सादर केला असून त्यामध्ये पोलीस मुख्यालय ते पालवन चौक धानोरा रोड असून त्यास मा.मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. सदरील प्रस्ताव निधी मागणी व प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई याठिकाणी पाठविण्यात आला असून लवकरच मान्यता मिळेल अशी खात्रीलायक माहिती मिळाली असल्याचे वंचितचे अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



### श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न

पोलीस मुख्यालय ते पालवन चौक या रस्त्याचे नूतनीकरणासह सिमेंट रोड नालीसह होणार आहे तांत्रिक मान्यता मिळाली आहे. निधी मागणी व प्रशासकीय मान्यता बाकी आहे ती ही लवकरच मिळेल असे असताना धानोरा रोडचे एक रहिवाशी यांना हा सर्व प्रकार माहीत असतानाही ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांना रस्त्याच्या कामाचे श्रेय मिळविण्यासाठी उपोषनाचा स्टंट करत असल्याचा आरोप वंचितचे अजय सरवदे यांनी केला आहे.

# खोटे आश्वासन देऊन दीशाभुल करतात!

## बोंबला : आ.नमितांनी मतदार संघ भकास केला



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडे वाडी येथील साठवण तलावास मंजुरी मिळावी म्हणून धर्मवीर छत्रपती संभाजीराजेशौर्वप्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्यच्या महिला प्रदेशाध्यक्षा राजश्रीताई राठोड या आमरण उपोषणास बसल्या आहेत. तीनदिवसापासून आमरण उपोषण चालू मात्र लोकप्रतिनिधी व प्रशासनाने पाठ फिरविली असून राजश्रीताईच्या उपोषणा ला ग्रामस्थांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. या बाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्या तील कोरडेवाडी येथे साठवण तलाव मंजूर करण्यासाठी राजश्री राठोड मृत्यूशी झुंज देत आहे त्यामुळे कोरडेवाडी येथील वातावरण संतप्त होत चालले आहे तरी गेल्या विधानसभा निवडणुकीत भुरट्या आमदारा नमीता मुंदडा यांनी गावकऱ्यांना साठवण तलाव मंजुर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते परंतु आमदार नमीता मुंदडा यांचे आश्वासन खोटे ठरले आहे कारण भ्राष्ठचारी आमदार नमीता मुंदडा यांचे निवडणूक येऊन कार्यकाळ संपायच्या वेळ झाली तरी सुद्धा आमदारा नमीता मुंदडा यांनी साठवण तलाव मंजुर केला नाही व सांध्यांच्या परीस्थितीमध्ये ऐका महीलेला उपोषन करावे लागते आहे हे दुर्दैव आमदार नमीता मुंदडा यांना निवडणूक देणाऱ्या जनतेचे आहे असे खोटे आश्वासने देऊन निवडून येणाऱ्या आमदार नमीता मुंदडा आहेत हे सिद्ध झाले आहे असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

## डॉ.योगेश क्षीरसागर : कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांची नव्यांसोबत सांगड घालणे गरजेचे आहे. जे भटकले होते, त्यांना चांगल्या मार्गावर आणणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवून पक्षात आलेल्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.बीडमध्ये सभागृहात मंगळवारी (दि.१३) पालवन चौक परिसराचे युवा नेते वैभव सोनवणे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.



व्यासपीठावर माजी नगरसेवक सय्यद इलियास, सरपंच अमोल बागलाने, लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, बहुजन परिषदेचे जिल्हाध्यक्ष विनोद हातागळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष बबन वाघमारे, तालुका उपाध्यक्ष मिलिंद ठोकळ, तालुका उपाध्यक्ष गोरख काळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अल्पसंख्याक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, गजानन जवकर, साजिद जागीरदार, सचिन बहिरवाळ आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात बीड मतदारसंघात

पान २ वर...

# जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदारांची धाव!

## निवेदन : मुख्य आरोपी बबन शिंदेला तात्काळ अटक करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड २०० कोटी ठेव घोटाळा गुन्ह्यातील मुख्य आरोपी बबन शिंदे याला तात्काळ अटक करून गुन्ह्याचा फेर तपास करावा. एम पी आयडी १९९९ कायद्या अंतर्गत पाठवलेला प्रस्ताव अपूर्ण असून, या प्रस्तावात मुख्य आरोपी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी, संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांची बीड जिल्हा बाहेरील मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करावी. एस आय टीचे पुनर्गठन करण्यात यावे. या विविध मागण्यासाठी जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदारांनी बीडचे नूतन पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ यांची भेट घेतली. थोडा वेळ द्या प्रकरणाची पूर्ण माहिती घेतो. कसून चौकशी करून ठेवीदारांना न्याय देऊ असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी अशोकराव हिंगे, ॲड. अप्पासाहेब जगताप, डॉ. अरविंद काकडे, मारुती तिपाले, शेख कुतुब भाई, भाऊसाहेब परसे, इंजि. सखाराम कळासे, चंद्रकला बांगर, विशाखा सूर्यवंशी, मीरा सोनवणे, रवींद्र पालीमकर, अच्युत वाघ, सूर्यभान नवले, डॉ. उमरजकर, सुभाष शिराळे, प्रवीण पोकळे, महेश साळप्पा, अच्युत सावंत, इंजि. मुलाणी आदिसह ठेवीदार उपस्थित होते.




जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात ०३ जुलै २०२३ रोजी गुन्हा नोंद झाला. ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी एस आय टीची नेमणूक झाली. दुर्दैवाने एसआयटी पथकातील तपास अधिकारी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे एक कोटी लाच

पान २ वर...

# जलजिवनची महीती देण्यास टाळाटाळ !

## चर्चा : केज पंचायत समितीत महाघोटाळा तर नाही?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे बोबडेवाडी येथील के ज नदीपात्रातील जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचे पीतळ केज पंचायत समितीला दीलेल्या माहीती अधिकारातील उघडे पडणार होते परंतु केज पंचायत समिती विहीची माहीती देण्यासाठी विलंब करत असल्यामुळे जनतेत संभ्रम निर्माण होतो आहे की केज पंचायत समिती मध्ये महाघोटाळा आहे की काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे.कारण रतनराव बोबडे यांनी दीलेल्या जनमाहिती अधिकारातून जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीच्या कामात केलेला महाघोटाळा उघडकीस येणार होते परंतु पंचायत समिती केज माहीती देण्यासाठी विलंब करत असल्यामुळे



तरी जलजिवन मिशन योजने अंतर्गत झालेल्या विहीरीच्या कामात काळाबाजार करण्यात आलेला असुन अधिकारी यांचे पीतळ उघडे पडणार असल्याचे समजले जाते आहे. तरी मौजे बोबडेवाडी ता. केज जि.बीड येथील केजडी नदीचे पात्रात जल जिवन मिशन योजनेतील विहिरीची प्रस्थावीत केलेल्या कार्यवाही बाबतची आणि कार्यारंभापासून अद्दप पर्यंतची माहिती मिळणे

पान २ वर...

# निवेदन देणाऱ्याला अरेरावीची भाषा

## अक्षय कोकाटे : बीडसह जिल्ह्यातील गुटखा बंद करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरासह जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री चालू आहे. गुटखा बंदी करण्यात यावी या मागणीचे निवेदन घेऊन बीडचे अन्न व औषध सहाय्यक आयुक्त संतोष कांबळे यांना निवेदन देण्यासाठी गेले असता राज्यात गुटखा बंदी असताना देखील खुलेआम गुटखा विक्री सरसपणे चालू कशी हा जाब विचारला, बीड सह जिल्ह्यातील,शाळा, कॉलेज, विविध शासकीय कार्यालय समोरील दुकाने, तसेच गल्लीबोळातील किराणा दुकानावर देखील गुटखा सहज उपलब्ध होत आहे. यावर बंदी आणावी कारवाई व्हावी अशा मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे नेते अक्षय कोकाटे अन्न व औषध प्रशासन अधिकारी संतोष कांबळे यांना दिले. व कारवाईची मागणी केली उलट त्यांनाच



आपण गुटखा विक्रेत्यांची अड्डे व माहिती द्या, त्यानंतर आम्ही कारवाई करू असे सांगितले, तसेच आमच्याकडे कर्मचारी कमी आहेत. आम्ही ग्राउंड लेव्हल ला जाऊन कारवाई करू शकत नाहीत. असेही उलट सुनावले, कार्यात कर्मचारी कमी आहेत असे निवेदनकर्त्यांनी लिखित स्वरूपात माहिती द्या अशी मागणी केल्यानंतर मला काही एकच काम आहे का, मी आता माहिती देऊ शकत नाही, त्यानंतर त्यांनी पोलिसांची धमकी देऊन ऑफिस बाहेर काढण्याची सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या, यावर अरेरावीची व उदारपणाची भाषा केली . निवेदनाची तात्काळ दखल घेऊन आपण कारवाई करा अशी मागणी करण्यात आली. अन्यथा लवकरच रिपाई च्या वतीने लवकरच अन्न व औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यासमोर समोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

# शेकापचा झेंडा विधानसभेत फडकवा!

## ॲड.नारायण गोले : माजलगाव तालुक्यात संवाद यात्रा



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर अनेक गावांना रस्ता नाही, दळणवळणाची साधनं नाहीत, गावातील मुलांना शिकायला चांगले शाळा नाहीत, शाळेत चांगले शिक्षक नाहीत, तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाला कीफायतशिर हमीभाव आजही मिळत नाही, परंतु राज्यकर्ते आमदाराचे मानधन, भत्ते आणि भ्रष्टाचारात मग्न आहेत, शेतकरी आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत असताना त्यावर चिंतन करायला कोणालाही वेळ नाही उलटपक्षी कोट्यावधींच्या गैरव्यवहारातून रातो-रात आमदार विकले जात आहेत, पिढ्यान पिढ्या घराणेशाही पोसली जात असून केवळ भ्रष्टाचार आणि सत्ता केंद्रस्थानी ठेवून राजकारण करणाऱ्या लोकांना जनसामान्याचे सोयरसुतक उरलेले नाही, भ्रष्ट प्रस्थापित पुढाऱ्यांकडून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे भले होण्याची सुताराम शक्यता उरलेली नाही, त्यामुळे शेतकऱ्याच्या

पान २ वर...

## मनोज जरांगे : महायुती, महाविकास आघाडी दोन्हीही विरोधी

# उभे करायचे की पाडायचे ठरवू !

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

२९ऑगस्टला विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे उमेदवार उभे करायचे की मराठा आरक्षणाचा विरोध करणाऱ्यांना पाडायचे याचा निर्णय घेणार आहोत उभे करण्यापेक्षा पाडापाडी मस्त असते ११३आमदार नक्कीच पाडू असा इशारा मनोज जरांगे यांनी नगर येथे राज्यकर्त्यांना दिला

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे आणि सगे सोयरे कायदा निर्माण व्हावा यासाठी मनोज जरांगे यांनी राज्यभर शांतता रॅली आयोजित केलेल्या आहेत नगरमध्ये सोमवारी ही रॅली झाली नगर शहरातील जुन्या बस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास जरांगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून चौपाटी कारंजावर जरांगे पाटील यांची सभा घेण्यात आली. ते म्हणाले की २९ऑगस्टला विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे उमेदवार उभे करायचे की मराठा आरक्षणाचा विरोध करणाऱ्यांना पाडायचे याचा निर्णय घेणार आहे आपण पाडायचे ठरवले तर यांचे ११३ आमदार नक्कीच पाडू फक्त उभे करायचे ठरवले तर जो उमेदवार असेल त्याच्याशी जमत नसले तरी त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे काम समाजाने केले पाहिजे मुंबईत नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने १७ ते१८ टक्के मराठा समाज आहे त्यामुळे मुंबईतील १९ जागांचा कार्यक्रम आपण नक्कीच करू शकतो असा दावाही मनोज जरांगे यांनी केला .




विधानसभेत नावे घेऊन पाडणार लोकसभा निवडणुकीत मी फक्त पाडा म्हटले होते कुणाची नावे घेतली नव्हती मात्र आता विधानसभा निवडणुकीत नावे घेऊन पाडण्याची सांगणार आहे महायुती व महाविकास आघाडी कोणीही मराठा आरक्षणाच्या बाजूने नाहीत आपल्याला विरोध करायचा म्हणून ते त्यांच्यातील भांडणे विसरून एक झाली आहेत त्यामुळे ह्यावेळी पाडायचा असा आदेश झाल्यानंतर दणादण पाडायचे असे आवाहन त्यांनी केले

# औषधी वनस्पतींचे मूलद्रव्यात्मक विश्लेषण

## डॉ.पूजा सूर्यवंशी:जीव विज्ञान आधारित कार्यशाळा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

कै शंकरराव गुट्टे ग्रामीण महाविद्यालय धर्मापुरी ता परळी वैजनाथ जिल्हा बीड,श्री बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जिल्हा बीड, श्रीमती केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालय बीड तसेच शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जिल्हा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रोफेसर विजय कोठेकर जीव विज्ञान व्याख्यानमाला २०२४, दिनांक ०५ ऑगस्ट २०२४ ते १० ऑगस्ट २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयीन विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अध्यापक, प्राध्यापक या सर्वांना जीवविज्ञान शास्त्रातील नवीन संशोधनाविषयीची इत्यंभूत माहिती मिळावी या उद्देशाने




ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. सदरील व्याख्यानमालेचे उद्घाटन दिनांक ०५ ऑगस्ट २०२४ रोजी प्रोफेसर निखिल गायकवाड, वनस्पतीशास्त्र विभाग , शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या उपस्थितीत आभासी पद्धतीने करण्यात आले. व्याख्यानमालेच्या प्रथम सत्राचे वक्ते म्हणून प्रोफेसर गजानन झोरे सर, जैवतंत्रज्ञान विभाग, केंद्रीय विद्यापीठ राजस्थान यांनी संशोधना मधील नवीन प्रवाह व त्यासाठी परिणामकारक जैविक घटक याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रोफेसर मुकुंद कुलथे सर , वनस्पतीशास्त्र विभाग , मिलिंद विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, यांनी नवसंशोधकांनी सजीवांसमोरील आव्हाना चा प्रतिकार करण्यासाठी उपलब्ध घटकांचा उपयोग करून नवनवीन संशोधन

पान २ वर...